१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शनिवार १३ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१००, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 100 Marathi - Daily - Mumbai, 13 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in

Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

NCP शरद पवार पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# प्रशांत महासागरात 'एल निनो'चे अक्राळविक्राळ रूप

# उष्णतेची उच्च पातळी! दुष्काळ, वणवे, वादळाचा इशारा



**प्रशांत महासागराच्या वाढलेल्या तापमानामुळे निसर्गाचा अनाकलनीय हवामान घटक असलेला एल निनो सक्रिय झाला आहे. यंदा तो ऐतिहासिक पातळीवर तीव्र रुप धारण करण्याची शक्यता आहे, असा इशारा हवामान शास्त्रज्ञांनी दिला आहे. भारतातही याचा परिणाम होऊन तीव्र उष्णतेची लाट येण्याचा इशारा देण्यात आला आहे.**

■ वॉशिंग्टन

**हवामानशास्त्रज्ञांच्या** अंदाजानुसार यंदाचा एल निनो १९९७ मधील विक्रमी एल निनोच्या बरोबरीचा किंवा त्याहून अधिक तीव्र असू शकतो. १९९७ मध्ये एल निनोच्या प्रभावामुळे उष्णतेच्या तीव्र लाटा, पूर, दुष्काळ, चक्रीवादळे आणि वणवे अशी नैसर्गिक संकटे ओढवली होती. या नैसर्गिक संकटांमुळे अब्जावधी डॉलरचे नुकसान झाले होते.

अमेरिकेच्या नॅशनल ओशनिक अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशनने एल निनो सक्रिय झाल्याच्या वृत्ताला अधिकृतपणे दुजोरा दिला आहे. एल निनो म्हणजे विषुववृत्ताजवळ प्रशांत महासागराचे पाणी गरम होणे. ज्याचा जगभरातील हवामानाच्या चक्रावर परिणाम होतो. यंदा शरद ऋतुच्या उत्तरार्धात आणि हिवाळ्याच्या सुरुवातीला एल निनो एवढा तीव्र होईल की, १९५० पासूनच्या ऐतिहासिक नोंदींनुसार तो आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या एल निनो घटनांपैकी एक ठरेल, अशी घोषणा नॅशनल ओशनिक अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशनने केली आहे.

क्लार्क विद्यापीठातील हवामान शास्त्रज्ञ एबी फ्रेझियर सांगतात की, एल निनोमुळे समुद्रात खोलवरून उष्ण पाण्याचे लोट पृष्ठभागाजवळ येतात. त्यामुळे हवामानाच्या रचनेवर प्रतिकूल परिणाम होतात. जगभरातील अनेक भागांमध्ये त्यामुळे तीव्र स्वरुपाच्या हवामान बदलाशी संबंधित घटना घडतात.

यंदाच्या एल निनोमुळे भारतात तीव्र उष्णतेच्या लाटा येण्याची शक्यता आहे. ऑस्ट्रेलियाला दुष्काळ, वणवे आणि कडक उन्हाळ्याचा सामना करावा लागू शकतो, असा अंदाज हवामानशास्त्रज्ञांनी वर्तविला आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज म्हणाले की, यंदा दुष्काळाचा अंदाज असल्याने तयारी केली आहे. समिती लक्ष ठेवून आहे. शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये.

### महाराष्ट्रात दुष्काळ नाही

हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख महाराष्ट्राबद्दल सांगताना म्हणाले की, १३ जून नंतर पाऊस सुरू होईल. १३ जून ते १९ जून दिवसाआड पाऊस राहील. यंदा पाऊस तीन टप्प्यांत येणार आहे. २० ते ३० जून पुन्हा पाऊस येईल. पण तो नागपूर, कर्नाटककडून येईल. त्यानंतर तिसऱ्या टप्प्यात १० ते १५ जुलै पाऊस येईल. पण जमिनीत वीतभर ओल गेल्यानंतरच पेरणी करा. ११ जूनला सूर्याला खळ पडला तर दुष्काळ येतो. पण आज खळ पडलेला नाही. त्यामुळे दुष्काळ पडणार नाही. फक्त तीन टप्प्यांत पाऊस पडेल. सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात परतीचा पाऊस धुमाकूळ घालेल.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## थोडक्यात...

### भोंदू खरात प्रकरणात उज्ज्वल निकम सरकारी वकील

**नाशिक** - अंधश्रद्धा, तंत्र-मंत्र आणि उपचारांच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात राज्य सरकारने ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेला अधिक गती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशोक खरात याच्याविरोधात अनेक महिलांनी गंभीर स्वरूपाच्या तक्रारी दाखल केल्यानंतर नाशिक पोलिसांनी त्याला अटक केली आहे. या प्रकरणाचा तपास एसआयटीकडे सोपवला असून, तपासादरम्यान अनेक धक्कादायक पुरावे हाती लागल्याचा दावा तपास यंत्रणांनी केला. याशिवाय इतरही अनेक गुन्हे खरातवर नोंदवण्यात आले आहेत. दरम्यान, अशोक खरात याचे काही राजकीय नेते आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांशी संबंध असल्याच्या चर्चा आहेत. तसेच त्याच्या मालमत्तेची चौकशी विविध यंत्रणांकडून सुरू असल्याची माहिती आहे.

### वेतन थकल्याने विक्रोळीत बेस्ट कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**मुंबई** - बेस्ट उपक्रमासाठी सेवा देणाऱ्या ओलेक्ट्रा ई-बस चालकांनी वेळेवर वेतन न मिळाल्याने आज विक्रोळी आगारात आंदोलन केले. पगार रखडल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले. बेस्टच्या ताफ्यात ओलेक्ट्रा कंपनीमार्फत पुरविण्यात आलेल्या ई-बसचे चालक आणि संबंधित कर्मचारी यांचे वेतन वेळेत जमा झाले नाही. यामुळे संतप्त कर्मचाऱ्यांनी विक्रोळी आगारात एकत्र येत आंदोलन केले. त्यांनी थकीत वेतन तातडीने अदा करण्याची मागणी केली. आंदोलनाची माहिती मिळाल्यानंतर ईव्ही ट्रान्सच्या महाव्यवस्थापकांसोबत झालेल्या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा करण्यात आली.

### युद्ध थांबण्याच्या अपेक्षेने शेअर बाजार उसळला

**मुंबई** - अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील हल्ले थांबवण्याचे आदेश दिल्याने निर्माण झालेल्या युद्धसमाप्तीच्या शक्यतेमुळे आज भारतीय शेअर बाजारात जबरदस्त उसळी नोंदवली गेली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १६९० हून अधिक अंकांनी उसळला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीने आपला २३,५०० अंकांचा स्तर पुन्हा ओलांडला. आजच्या तेजीमुळे सेन्सेक्समधील ३० कंपन्यांचे एकत्रिक बाजारमुल्य ७ लाख कोटी रुपयांनी वाढून ४६० लाख कोटी रुपयांवर पोहोचले. सेन्सेक्समधील सर्व तीस कंपन्यांच्या समभागांमध्ये आज तुफान खरेदी झाली.

## शरद पवार गट काँग्रेसमध्ये विलीन होणार? चर्चेला उधाण




**काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी काँग्रेसमधून वेगळे झालेल्या सर्व घटक पक्षांनी पुन्हा काँग्रेसमध्ये विलीन व्हावे आणि शरद पवार यांनी त्यासाठी पुढाकार घ्यावा, असे मत शिवसेना उबाठाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी काल व्यक्त केले होते. त्यानंतर आज लगेचच शरद पवारांचा गट काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चेला उधाण आले. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राऊतांच्या सूचनेचे स्वागत करत हा निर्णय घेण्याचा अधिकार सर्वस्वी शरद पवार यांना आहे, असे सांगून या चर्चेत भर घातली.**

■ मुंबई

**तृणमूल** काँग्रेसनंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाला काँग्रेसने आपल्या पक्षात विलीन करण्याची ऑफर दिल्याची चर्चा गेले दोन दिवस राजकीय वर्तुळात सुरू आहे. याबाबतीत अधिकृरित्या दोन्ही पक्षातील कुणीच काही वक्तव्य केले नव्हते. काल संजय राऊत यांनी या विषयावर टिपण्णी केल्यानंतर आज काँग्रेसच्या राज्यातील काही काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी भाष्य केले. काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले की, शरद पवार यांनी काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा प्रस्ताव २०२४ सालीच दिला होता. तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनीदेखील विलीनीकरणाला अनुकूल भूमिका मांडली. ते म्हणाले की, विलीनीकरणाच्या प्रस्तावाबद्दल मला काही माहिती नाही. मात्र काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसची विचारधारा एकच आहे. त्यामुळे भविष्यात काहीही होऊ शकते.

राजस्थानमधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी राऊत यांच्या मताला पाठिंबा देत असे आवाहन केले की, काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या सर्व घटक पक्षांनी पुन्हा काँग्रेसमध्ये सामील व्हावे आणि राहुल गांधी यांचे नेतृत्व स्वीकारावे. संजय राऊत यांनी मांडलेली » पान ७ वर

## मोदी हे देशाचे सर्वोत्कृष्ट पंतप्रधान मुख्यमंत्री फडणवीसांकडून कौतुक

■ मुंबई

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला १२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकार परिषद घेऊन मोदी सरकारच्या कामगिरीचा गौरव केला. फडणवीस म्हणाले की, मोदी यांना केवळ सर्वाधिक काळ निवडून आलेले पंतप्रधान नाहीत, तर देशाचे सर्वोत्कृष्ट पंतप्रधान आहेत. मोदी यांनी जगभरात भारताची प्रतिष्ठा उंचावली असून, आज एनडीए देशातील २२ राज्यांमध्ये सत्तेत आहे. देशाच्या सुमारे ८० टक्के भूभागावर एनडीएची सरकारे आहेत. याचवेळी त्यांनी काँग्रेस आणि विरोधी पक्षांच्या संभाव्य



विलीनीकरणाच्या चर्चेवरही टीका करत काँग्रेसला 'बुडते जहाज' म्हटले.

देशाची अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, डिजिटल व्यवहार, महिला सक्षमीकरण, गरिबी निर्मूलन आणि जागतिक स्तरावरील भारताची वाढती प्रतिष्ठा यांचा उल्लेख करत फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ४,३९९ दिवसांचा कार्यकाळ पूर्ण करत देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा सर्वाधिक काळ निवडून आलेल्या पंतप्रधानांचा विक्रम मोडला आहे. दोन्ही नेत्यांची तुलना होऊ शकत नाही. पण एखाद्या नेत्याचा कार्यकाळ किती मोठा आहे यापेक्षा त्या काळात देशासाठी काय काम » पान ७ वर

## इराणवरील हल्ले आम्ही थांबवले ट्रम्पचा दावा! युद्धबंदी होणार?

■ वॉशिंग्टन

**इराणविरुद्ध** सुरू केलेल्या युद्धात आज अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भूमिका बदलली. गुरुवारी इराणवरील हल्ले अधिक तीव्र करण्याची धमकी देणाऱ्या ट्रम्प यांनी आज दुसऱ्याच दिवशी इराणवर आता आणखी हल्ले करायचे नाहीत, असे आदेश दिले. तसेच एक-दोन दिवसांत शांतता करार होईल आणि अमेरिकेच्या वतीने उपराष्ट्राध्यक्ष जे डी व्हान करारावर स्वाक्षरी करतील, असे जाहीर करून टाकले.

हे युद्ध सुरू झाल्याला सुमारे तीन महिने होत आले आहेत. या तीन महिन्यांत ट्रम्प यांनी असंख्य वेळा युद्ध संपल्याचे दावे केले आहेत. सध्या अमेरिका आणि इराणमध्ये तात्पुरती युद्धबंदी जारी आहे. मात्र युद्धबंदीच्या काळातही अधूनमधून एकमेकांवर हल्ले केले जात आहेत. इस्त्रायल लेबनॉनमधील हिजबुल्लाच्या तळांवर हल्ले करते. तर प्रत्युत्तरादाखल इराण इस्त्रायलवर हल्ले करते, असे प्रकार सुरू आहेत. मंगळवारी अमेरिकेचे अपाचे हेलिकॉप्टर होर्मुजच्या » पान ७ वर

## मुंढवा जमीन प्रकरणी तेजवानीने जमिनीवरील मालकी हक्क सोडला

■ पुणे

**राज्याचे** माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांचे पुत्र खासदार पार्थ पवार यांच्याशी संबंधित पुण्यातील मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणातील मुख्य आरोपी शीतल तेजवानी हिने वादग्रस्त जमिनीवरील मालकी हक्काचा दावा मागे घेतला आहे. पुणे सत्र न्यायालयात याबाबत दाखल याचिका तिने मागे घेतली आहे.

मुंढवा येथील वनस्पती उद्यानासाठी राखीव असलेला ४० एकरचा भूखंड शीतल तेजवानीने बनावट कागदपत्रांच्या आधारे पार्थ पवार यांची ९९ टक्के भागीदारी असलेल्या अमेडिया कंपनीला अगदी कमी किमतीत विकला होता. महार वतनाच्या या जमिनीचे कुलमुखत्यारपत्र तेजवानीने आपल्या नावे तयार केले होते. त्याआधारे हा भूखंड खरेदी-विक्रीचा व्यवहार झाला होता. या प्रकरणात मागील वर्षी डिसेंबरमध्ये अटक झालेल्या तेजवानीला मुंबई उच्च न्यायालयाने २ लाख रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सशर्त जामीन मंजूर केला आहे. यामुळे पार्थ पवार या वादातून सुटण्याची शक्यता आहे.

## सरसकट कर्जमाफीसाठी पंढरपुरात आ. रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन

■ पंढरपूर

**राष्ट्रवादी** काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज पंढरपूर



येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली. महायुती सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीतील जाचक अटी व शर्ती रद्द करून राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला विनाअट सरसकट कर्जमाफी द्या. नाहीतर लढा सुरू राहील, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

पंढरपूर पोलिसांनी वाहतूक व्यवस्था आणि कायदा-सुव्यवस्थेचे कारण देत रोहित पवार यांना नोटीस बजावत पर्यायी जागा सुचवली होती. मात्र, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी निवडलेले आंदोलनस्थळ बदलणार नाही, अशी भूमिका घेत ते ठरलेल्या जागीच आंदोलनावर ठाम राहिले. त्यानंतर पोलिसांनी आंदोलनस्थळी मोठा बंदोबस्त तैनात केला. रस्त्यांवर बॅरिकेडिंगही केले. रोहित पवार यांनी नामदेव पायरीवर आरती करून » पान ७ वर

## मोहन भागवत प्रवास करताना ट्रेनवर पुन्हा एकदा दगडफेक

■ फिरोजाबाद

**राष्ट्रीय** स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत प्रवास करत असलेल्या स्वर्ण शताब्दी एक्स्प्रेसवर अज्ञातांकडून दगडफेक करण्यात आली. उत्तर प्रदेशातील फिरोजाबाद जिल्ह्यात घडलेल्या या घटनेमुळे रेल्वे प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणांमध्ये खळबळ उडाली आहे. दगडफेकीत रेल्वेच्या एका डब्याच्या खिडकीची काच फुटली असली तरी मोहन भागवत यांच्यासह सर्व प्रवासी सुरक्षित असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

मोहन भागवत हे कानपूरहून नवी दिल्लीकडे स्वर्ण शताब्दी एक्स्प्रेसने प्रवास करत होते. मक्खनपूर आणि फिरोजाबाद रेल्वे स्थानकादरम्यान ट्रेन वेगात असताना अज्ञात व्यक्तींनी रेल्वेवर दगडफेक केली. सरसंघचालक मोहन भागवत हे एक्झिक्युटिव्ह क्लासच्या ई-१ कोचमध्ये प्रवास करत होते.

ते बसले होते त्याच डब्यावर दगडफेक होऊन डब्याच्या खिडकीची काच फुटली. मोहन भागवत यांच्या सुरक्षेचा विचार करून ट्रेनला मार्गात कुठेही न थांबवता थेट टूंडला जंक्शनपर्यंत नेण्यात आले. दरम्यान मोहन भागवत यांच्या रेल्वे प्रवासादरम्यान दगडफेकीची ही पहिलीच घटना नाही.

## 'स्पेसएक्स'च्या आयपीओमुळे मस्क जगातील पहिले ट्रिलियनेअर बनले

**'स्पेसएक्स' कंपनीच्या विक्रमी आयपीओ (इनिशियल पब्लिक ऑफर) विक्रीमुळे उद्योगपती एलॉन मस्क यांच्या व्यावसायिक साम्राज्याच्या मूल्यामध्ये मोठी वाढ झाली असून, ते जगातील पहिले ट्रिलियनेअर म्हणजे एक ट्रिलियन डॉलरपेक्षा अधिक (१० लाख कोटी) संपत्ती असलेले पहिले व्यक्ती बनले आहेत. १३५ डॉलर या भावाने विकल्या गेलेल्या या आयपीओमुळे त्यांची संपत्ती तैवान देशाच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेपेक्षाही जास्त झाली आहे.**

■ वॉशिंगटन

**कंपनीच्या** कागदपत्रांची माहिती आणि फोर्ब्सच्या अंदाजानुसार स्पेसएक्सच्या समभागांची



बाजारात नोंदणी सुरू झाल्यानंतर मस्क यांची एकूण संपत्ती १.१ ट्रिलियन डॉलरच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. रॉकेट, उपग्रह आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात कार्यरत असलेली स्पेसएक्स कंपनी त्यांच्या संपत्तीचा सर्वात मोठा स्त्रोत ठरली आहे. या ऐतिहासिक टप्प्यामुळे मस्क यांचे नाव संपत्तीच्या अशा पातळीवर पोहोचले आहेत, जिथे आजवर कोणतीही व्यक्ती पोहोचलेली नाही. ब्लूमबर्ग बिलियनेअर्स इंडेक्सनुसार, स्पेसएक्सचा आयपीओ येण्यापूर्वीही मस्क हे सुमारे ९७१ अब्ज डॉलर संपत्तीसह जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती होते. जगातील सर्वाधिक धनिकांच्या यादीत असलेल्या 'अल्फाबेट'चे » पान ७ वर

## फ्रान्समधील 'जी- ७' शिखर परिषदेत भारत सहभागी होणार

■ नवी दिल्ली

**भारत** १५ ते १७ जून दरम्यान फ्रान्समधील एव्हियान येथे होणाऱ्या ५२ व्या जी-७ शिखर परिषदेत सहभागी होणार आहे. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन यांच्या निमंत्रणावरून, पंतप्रधान नरेंद्र मोदी सलग सातव्यांदा व भारताच्या १३ व्या सहभागासाठी या परिषदेला उपस्थित राहतील.

भारत हा 'जी-७' चा स्थायी सदस्य नसला तरी जागतिक आव्हाने व 'ग्लोबल साऊथ'च्या हितांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी 'पाहुणा राष्ट्र' म्हणून भारताला आमंत्रित केले गेले आहे. भारताव्यतिरिक्त ब्राझील, दक्षिण कोरिया आणि केनिया यांनाही आमंत्रित करण्यात आले आहे. या परिषदेतील १६ आणि १७ जून रोजी होणाऱ्या आउटरीच सत्रांमध्ये प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय भागीदारी, शाश्वत आर्थिक वाढ, विकास सहकार्य व आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा सुरक्षित वापर यावर चर्चा होईल. या परिषदेच्या निमित्ताने मोदी अनेक जागतिक नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा करतील. परिषदेनंतर फ्रान्समधील दौऱ्यादरम्यान मोदी पॅरिस येथे युरोपमधील सर्वात मोठ्या तंत्रज्ञान व स्टार्टअप कार्यक्रमात सहभागी होतील व 'भारत इनोव्हेट्स'या कार्यक्रमाचे उद्घाटन करतील.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# गृहिणींचा सन्मान! ऐतिहासिक निर्णय

भारतासारख्या कुटुंबव्यवस्थेला वेगळं महत्त्व असलेल्या देशामध्ये घरातील गृहिणी ही किती महत्त्वपूर्ण आहे हे सर्वोच्च न्यायालयाच्या एका ताज्या निकालावरून आता अधिक ठळकपणाने स्पष्ट झाले. जगाच्या पाठीवर भारत हा असा एकमेव देश आहे की जिथे समाजव्यवस्था एका सशक्त कुटुंबपद्धतीवर आधारलेली आहे. आणि या कुटुंब पद्धतीचा प्रमुख कणा त्या घरातली गृहिणी असते. भारताला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे होत आहेत. आणि गेल्या काही शतकांची इथली समाजव्यवस्था पाहिली तर ती पुरुष प्रधान असल्याचे पाहायला मिळते. शंभर वर्षांपूर्वी भारतातल्या स्त्रियांना घरप्रपंचात अडकवून ठेवले जात होते. आता काळ बदलला आणि भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास तीस ते चाळीस टक्के महिला या घराबाहेर पडून नोकरी व्यवसाय करू लागल्या. परंतु अजूनही किमान पन्नास ते साठ टक्के घरामध्ये त्या घरातली गृहिणी आपला प्रपंच चालवण्यासाठीच अधिक परिश्रम करीत असते. ती बाहेर नोकरी व्यवसाय करू शकते. परंतु कुटुंबाची अनेक अर्थांनी काळजी घेण्याचे काम या घरातील गृहिणी करते. मुलाबाळांच्या संगोपनाबरोबर घराची व्यवस्था टिकवून ठेवण्यात तिचा मोलाचा सहभाग असतो. आजही या घरकामामध्ये हातभार लावणाऱ्या गृहिणींची संख्या प्रचंड आहे. त्या नोकरी व्यवसाय करीत नाहीत. म्हणून त्यांचे महत्त्व कमी लेखता येणार नाही. त्यांच्याकडून होणारे घरकाम किंवा कुटुंबाची व्यवस्था यासाठी त्यांच्याकडून घेतल्या जाणाऱ्या परिश्रमाचा मोबदला ठरवायचा झाला तर तो महिना तीस हजार होऊ शकतो. आणि कुठल्याही अचानकपणे उद्‌भवलेल्या संकटामध्ये एखाद्या घरातील गृहिणीचा मृत्यू झाला तर त्या कुटुंबाला तिचे तीस हजार मासिक उत्पन्न लक्षात घेऊन नुकसान भरपाई किंवा शासकीय मदत मिळाली पाहिजे अशा प्रकारचा अतिशय महत्त्वपूर्ण आणि आगळावेगळा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयाने देशभरातील कोट्यवधी महिलांचा खऱ्या अर्थाने सन्मान झाला आहे असे म्हणायला हरकत नाही.

**तीस हजारांचे मासिक वेतन**

आतापर्यंतच्या पुरुष प्रधान परंपरेतल्या कुटुंबामध्ये घरकाम करणाऱ्या महिलेचे स्थान नेहमीच दुय्यम राहिलेले आहे. नोकरी करणारी महिला असली तरी तिच्याविषयी दाखवला जाणारा आदर किंवा तिचे समाजातले स्थानही वेगळेपणाने स्वीकारले जाते किंवा अधोरेखित होते. खरे तर श्रमाचा, कौशल्याचा व्यवस्थापनाचा एकूणच कुटुंबाच्या आर्थिक नियोजनाचा भार हा त्या घरातल्या महिलेवर असतो. व्यापक अर्थाने कुटुंबाच्या व्यवस्थापनाची मोठी गुणवत्ताही तिच्याकडे असते. परंतु ती केवळ नोकरी करीत नसल्याने तिच्या या गुणवत्तेचा आदर होत नाही किंवा विचारही होत नाही. उलट ती नोकरी करीत नाही म्हटल्यानंतर तिला गृहित धरले जाते. आणि मग घरातल्या गृहिणीने घरातली सगळी कामे केली पाहिजेत, असा अलिखित नियमच तिच्यावर लादला जातो. खरे तर वस्तुस्थिती तशी नसते. नोकरी करणाऱ्या स्त्रियांइतकीच कार्यक्षमता तिच्याकडे असते. आणि तिच्या या परिश्रमाचा योग्य तो सन्मान झाला पाहिजे. तिला गृहित धरता कामा नये असा एक व्यापक दृष्टिकोन सर्वोच्च न्यायालयाने देशापुढे ठेवला आहे. पंजाबमधल्या एका दुर्घटनेमध्ये एका महिलेचा मृत्यू होतो आणि तिच्या नुकसानभरपाईची मागणी करताना ती कशी देता येणार नाही याच्यावर वादप्रतिवाद होतो. सर्वोच्च न्यायालयाने हा प्रकार इतक्या गांभीर्याने आणि संवेदनशीलतेने हाताळला. आणि नुकसान भरपाई देताना तिच्या मासिक उत्पन्नाचाच विचार करायचा असेल तर तीस हजारांपेक्षा कमी होत नाही हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. स्वाभाविकपणे यापुढे जर असा कोणताही दुर्दैवी प्रसंग घरातल्या गृहिणींबाबत घडला तर तिला तीस हजार मासिक वेतन गृहित धरून नुकसान भरपाई मिळू शकेल. आता इतक्या महत्त्वाच्या निकालाबाबत केंद्र आणि राज्य सरकारने स्वतः पुढाकार घेतला पाहिजे. आणि घरकाम करणाऱ्या म्हणजेच नोकरी न करणाऱ्या महिलांच्या परिश्रमाला योग्य ते आर्थिक पाळबळ दिले पाहिजे. न्यायालयाचा हा निर्णय केंद्र आणि राज्य सरकारांसाठी एक दिशानिर्देश मानता येऊ शकतो.

**महिलांबाबतचा दृष्टिकोन**

आज केंद्र आणि राज्य सरकारतर्फे महिला सशक्तीकरणाच्या वेगवेगळ्या घोषणा होत असतात. अगदी लाडकी बहीण योजनेपासून ते लखपती दिदीपर्यंत महिलांना रोजगाराच्या संधी देण्यासाठी प्रयत्न होतो. परंतु जवळपास दीडशे कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात समाज कितीही पुढारला, आधुनिक झाला तरी पुढची पाच पन्नास वर्षे गृहिणी म्हणून स्वयंस्फूर्तीने कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या महिलांची संख्या मोठीच राहणार आहे. कारण ती एकूणच कुटुंब व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण आधार ठरते. आज तर अगदी शिकल्या सवरलेल्या उच्चशिक्षित महिला काही काळ नोकरी करून स्वेच्छानिवृत्ती घेतात. आणि आपल्या कुटुंबाकडे लक्ष देण्याची भूमिका स्वीकारतात. एकूणच कुटुंब व्यवस्था आणि समाज व्यवस्थेसाठी कुटुंबातल्या गृहिणीचे स्थान हे अनन्यसाधारण राहणार आहे तिला जर अशा प्रकारचे आर्थिक संरक्षण वेगवेगळ्या योजनांच्यामार्फत मिळाले तर ते तिच्यासाठी अधिक सहाय्यभूत ठरणार आहे. दुर्दैवाने महिला सक्षमीकरणाच्या घोषणा जरी होत असल्या तरी अजूनही महिलांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात कोणताही अमूलाग्र बदल झाल्याचे दिसत नाही. त्याचे ठळक उदाहरण सर्वोच्च न्यायालयापुढे आलेली हीच पंजाबची केस आहे. नुकसान भरपाई मागणारा हा खटला तेवीस वर्षांपूर्वी न्यायालयात दाखल झाला होता. त्याबाबतचा निर्णय आता इतक्या उशीराने झालेला आहे. यावरून महिलांसदर्भातला दृष्टिकोन फार बदलला नसल्याचेच निदर्शक ठरते. आपल्या देशातील न्यायालयीन प्रक्रिया ही प्रचंड लांबलचक आणि गुंतागुंतीची आहे. न्याय मिळणे तर दूरच राहते. परंतु झालेला अन्याय समजावून सांगण्यासाठीच अनेकांची शक्ती, पैसा खर्च होत असतो. ही परिस्थिती बदलण्याचीदेखील आवश्यकता आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

जे लोक तुम्हाला समजून घेत नाहीत, त्यांना समजवण्याचा प्रयत्न करू नका. कारण समुद्र खारा आहे आणि खाराच राहणार. त्यात साखर टाकण्याचा प्रयत्न करू नका.

## पंचांग

शनिवार, १३ जून २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
* अधिक ज्येष्ठ कृष्ण त्रयोदशी
नक्षत्र : कृत्तिका
-: जन्मराशी :-
००-०१ ते ९-२५ मेष
०९-२६ ते २४-०० वृषभ



रवी उदय- ०६-०२
रवी अस्त- १९-१५

**शिवरात्री; बालश्रम विरोधी दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### सिंपल मटार पनीर ग्रेव्ही



★ **साहित्य :-** ४ सर्व्हिंग्ज, २ टेबलस्पून बटर, १ टेबलस्पून तेल, २०० ग्रॅम पनीर, १०० ग्रॅम फ्रेश किंवा फ्रोजन मटार, २ कांदे उभे चिरून, २ टोमॅटो चिरून, १ हिरवी मिरची, १ इंच आलं, ६-७ लसूण पाकळ्या, १ टेबलस्पून मगज बी, १ टेबलस्पून काश्मीरी लाल तिखट, १ टीस्पून धणे जिरे पूड, १ टीस्पून गरम मसाला, १ टीस्पून किचन किंग मसाला, चवीनुसार मीठ आणि साखर, १ टीस्पून कसुरी मेथी, बारीक चिरलेली कोथिंबीर

★ **कृती :-** ३० मिनिटे, सर्वात आधी एका कढईमध्ये उभा चिरलेला कांदा, टोमॅटो, हिरवी मिरची, आलं, लसूण आणि मगज बी घालून टोमॅटो मऊ होईपर्यंत परतून घ्या. त्यानंतर हे मिश्रण थंड झाल्यावर मिक्सरमधून बारीक वाटून घ्या. त्याच कढईमध्ये तेल आणि बटर गरम करून त्यात बारीक चिरलेला कांदा घालून परतून घ्या. आता त्यात वाटलेले मिश्रण घालून तेल सुटेपर्यंत परतून घ्या. आणि त्यात धणे, जिरे, आणि किचन किंग मसाला घालून परतून घ्या. आता यात काश्मिरी लाल तिखट घालावे व मिश्रण परतून घ्या.

हवे असल्यास अजून थोडे बटर घाला. मिश्रण एकजीव झाले की, त्यात गरजेनुसार गरम पाणी घालून घ्या. नंतर त्यात चवीनुसार मीठ आणि साखर घालून मिक्स करावे. आणि मग यात मटार घालून घ्या, मटार थोडे शिजले की, नंतर त्यात पनीरचे तुकडे घालून एक उकळी येऊ द्या. नंतर यात कसुरी मेथी घालून झाकून २ मिनिटे वाफ काढून घ्या. आणि आपली सिंपल मटार पनीर ग्रेव्ही तयार आहे. वरून कोथिंबीर घालून सर्व्ह करा. चपाती किंवा जिरा राईससोबत भारी लागते.




# फुटबॉल विश्वचषक! मेक्सिकोची २-० ने विजयी सलामी

## क्विनोनेस व जिमेनेझच्या गोलमुळे द. आफ्रिकेचे लोटांगण



**मेक्सिको सिटी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या फिफा विश्वचषकाच्या उद्घाटन सामन्यात सहयजमान मेक्सिकोने दक्षिण आफ्रिकेला २-० ने पराभूत करून विजयी सलामी दिली. या सामन्यात मेक्सिको संघाने सुरुवातीपासूनच दक्षिण आफ्रिकेवर वर्चस्व गाजवले आणि ज्युलियन क्विनोनेस व राऊल जिमेनेझ यांच्या गोलच्या जोरावर आपल्या मोहिमेची सुरुवात विजयाने केली. या सामन्यात अवघ्या १७ वर्षांचा तरुण खेळाडू गिल्बर्टो मोराने मेक्सिकन फुटबॉलच्या इतिहासात आपले नाव कोरले. मैदानात उतरताच मोरा विश्वचषकात मेक्सिकोचे प्रतिनिधित्व करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला.**

■ मेक्सिको सिटी

**मेक्सिकोने** सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला आणि नवव्या मिनिटाला त्याचे फळ मिळाले. ज्युलियन क्विनोनेसने दक्षिण आफ्रिकेचा बचाव भेदून एक शानदार गोल केला आणि संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. या सुरुवातीच्या गोलनंतर मेक्सिकोने नियंत्रण कायम ठेवले. १७ व्या मिनिटाला टेबोहो मोकोएनाला फाऊलसाठी पिवळे कार्ड दाखवण्यात आल्याने दक्षिण आफ्रिकेला पहिला धक्का बसला. २५ व्या मिनिटाला स्पर्धेतील पहिला हायड्रेशन ब्रेक घेण्यात आला. पहिल्या हाफच्या अखेरपर्यंत दक्षिण आफ्रिकेला प्रभावी प्रत्युत्तर देता आले नाही आणि मेक्सिकोने १-० अशी आघाडी घेतली. दक्षिण आफ्रिकेसाठी दुसऱ्या हाफची सुरुवात खराब झाली. ४९ व्या मिनिटाला स्पेफेलो सिथोलेला थेट रेड कार्ड दाखवून मैदानाबाहेर पाठवण्यात आले. गोलच्या दिशेने जात असलेल्या एरिक गुटिएरेझला सिथोलेने पेनल्टी बॉक्सच्या बाहेर फाऊल केले. या निर्णयानंतर दक्षिण आफ्रिकेला जवळजवळ संपूर्ण दुसरा हाफ १० खेळाडूंसह खेळावा लागला. याचा पुरेपूर फायदा घेऊन मेक्सिकोने आक्रमण सुरू ठेवले. अखेरीस ६७ व्या मिनिटाला राऊल जिमेनेझने गोल करून आपली आघाडी २-० अशी वाढवली. ८४ व्या मिनिटाला दक्षिण आफ्रिकेच्या अडचणी आणखी वाढल्या. थेम्बा झ्वानेने रॉबर्टो अल्वाराडोला धडक दिली. त्यामुळे रेफरीने त्याला रेड कार्ड दाखवले. यामुळे दक्षिण आफ्रिकेचे नऊ खेळाडू मैदानात उरले आणि त्यांच्या पुनरागमनाच्या आशा जवळजवळ संपुष्टात आल्या. इंज्युरी टाईममध्ये (९०+२ मिनिटांवर) मेक्सिकोलाही एक धक्का बसला. खुलिसो मुडाऊवर फाऊल केल्याबद्दल डिफेंडर सेझार मोंटेसला रेड कार्ड दाखवण्यात आले. असे असूनही त्याचा सामन्याच्या निकालावर कोणताही परिणाम झाला नाही. अंतिम शिट्टी वाजताच मेक्सिकोने २-० असा दणदणीत विजय नोंदवला.

**रविवार १४ जूनचे सामने**

| भारतीय वेळ | संघ | ठिकाण |
|---|---|---|
| १२.३० मध्यरात्री | कतारविरुद्ध स्वित्झर्लंड | सांता क्लारा |
| ३.३० पहाटे | ब्राझीलविरुद्ध मोरोक्को | न्यू जर्सी |
| ६.३० सकाळी | हैती विरुद्ध स्कॉटलंड | फॉक्सबरो |
| ९.३० सकाळी | ऑस्ट्रेलियाविरुद्ध तुर्किये | व्हँकुव्हर |

## केन विल्यमसनची अचानक क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर

■ लंडन



**न्यूझीलंडचा** अनुभवी खेळाडू केन विल्यमसनने अचानक आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. त्याच्या निवृत्तीची माहिती न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने एक्सवरून दिली. त्याचा एक मोठा व्हीडिओदेखील त्यांनी शेअर केला. न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्यातील तीन सामन्यांची कसोटी मालिका सुरू असतानाच विल्यमसनने हा मोठा निर्णय जाहीर केला.
२०१० मध्ये न्यूझीलंडकडून पदार्पण करणाऱ्या विल्यमसनने आपल्या देशासाठी ३७८ आंतरराष्ट्रीय सामने खेळले. या काळात त्याने फलंदाजीत अनेक विक्रम आपल्या नावावर केले आणि ३५ वर्षीय विल्यमसनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण १९,३४६ धावा करत न्यूझीलंडचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू म्हणून कारकीर्द संपवली. त्याच्या नावावर ४८ शतके आणि ६ द्विशतकांची नोंद आहे. फलंदाज म्हणून अफाट यश मिळवण्यासहच त्याचे नेतृत्वही तितकेच प्रभावी ठरले.

## कोल्हापुरात ४ जुलैपासून राज्य मानांकन कॅरम स्पर्धा

■ मुंबई

**महाराष्ट्र** कॅरम असोसिएशन आणि कोल्हापूर जिल्हा हौशी कॅरम संघटनेच्या मान्यतेने कै. अशोक पुजारी यांच्या स्मरणार्थ १० व्या श्री दत्तराज चॅरिटेबल ट्रस्ट राज्य मानांकन कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा कोल्हापुरातील शिरोळ येथील नरसोबावाडी, हॉटेल मंगलम येथे ४ ते ६ जुलैदरम्यान पुरुष एकेरी आणि महिला एकेरी अशा दोन गटांमध्ये रंगणार आहे.

या स्पर्धेतील विजेत्यांना तब्बल १ लाख १० हजारांची रोख पारितोषिके देण्यात येणार असून, स्पर्धेचे प्रवेश महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या संकेतस्थळावर स्पर्धेचे प्रवेश अर्ज उपलब्ध आहेत. स्पर्धेत भाग घेण्यासाठी इच्छुक खेळाडूंनी आपल्या जिल्हा संघटनेशी संपर्क साधावा. महाराष्ट्र कॅरम असोसिएशनने ऑनलाईन नोंदणी पद्धत सुरू केली आहे.

## चेक प्रजासत्ताकविरुद्ध दक्षिण कोरियाचा विजय

■ झापोपान

**मेक्सिकोच्या** झापोपान येथे झालेल्या फिफा विश्वचषकाच्या दुसऱ्या सामन्यात पिछाडीवर पडल्यानंतर दक्षिण कोरियाने जोरदार पुनरागमन करून चेक प्रजासत्ताकला २-१ ने पराभूत केले. दक्षिण कोरियाकडून हाँग इन-बॉमने ६७ व्या मिनिटाला, ओ ह्योन-ग्यूने ८० व्या मिनिटाला आणि चेक प्रजासत्ताककडून ५९ व्या मिनिटाला लादिस्लाव क्रेजीने गोल केला.

पहिल्या हाफच्या २१ व्या मिनिटाला चेक प्रजासत्ताकला गोल करण्याची एक उत्तम संधी मिळाली. कोरियाच्या बचावाला भेदण्याचे आव्हान चेक प्रजासत्ताकसमोर होते, पण हे काम तितके सोपे नव्हते आणि चेक प्रजासत्ताकला या संधीचा फायदा घेता आला नाही. एका मिनिटानंतर चेक प्रजासत्ताकला पुन्हा संधी मिळाली, पण संघाला पुन्हा आघाडी घेण्यात अपयश आले आणि दोन्ही संघांना एकही गोल करता आला नाही. त्यानंतर दुसऱ्या हाफमध्ये ५९ व्या मिनिटाला चेक प्रजासत्ताकने गोल करून १-० अशी आघाडी घेतली. चेक प्रजासत्ताकसाठी लादिस्लाव क्रेजीने पहिला गोल केला.

**MAHAVITARAN** Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**TENDER NOTICE**

Tenders are invited for Procurement of Various Type Polymer & Porcelain Insulator with Estimated Cost of Rs. 9.83 Crs. against MSEDCL advertised Tender on website vide no. MMD/T-HTM2-11/0626 due for submission on dtd. 02.07.2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/

HO PR 137/26 | Chief Engineer (MMD)

**फॉर्म जी**
**गुंतवणूक व्यवस्थापन, वित्त, रोखे गुंतवणूक आणि वित्तीय सल्लामसलत या क्षेत्रांत कार्यरत**
**ग्रेव्हेक इन्व्हेस्टमेंट्स अँड फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड करिता स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६(ए) च्या उप-विनियमन (१) अन्वये)

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन आणि सीआयएन /एलएलपी क्र. | ग्रेव्हेक इन्व्हेस्टमेंट्स अँड फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड सीआयएनः U65990MH1993PTC070326 पीएएनः AAACG2968G |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | नोंद. कार्यालयः १३ ३रा मजला, खेतान भवन, १९८, जे. टाटा रोड, चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००२०. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | उपलब्ध नाही. |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | मुंबई |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | कंपनी गुंतवणूक, वित्तपुरवठा आणि वित्तीय सल्लामसलत सेवांच्या व्यवसायात गुंतली आहे. |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | शुन्य - वर्ष २०२२-२३ च्या उपलब्ध ताळेबंदानुसार |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | शुन्य |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी समाविष्ट असलेले पुढील तपशील उपलब्ध असलेले यूआरएलः | cirp.grevekinvestment@gmail.com येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराच्या पात्रता उपलब्ध असलेले यूआरएलः | cirp.grevekinvestment@gmail.com येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांकः | २८.०६.२०२६ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | ०८.०७.२०२६ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | १३.०७.२०२६ |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | २३.०७.२०२६ |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | २८.०७.२०२६ |
| १५. | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | २७.०८.२०२६ |
| १६. | ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | cirp.grevekinvestment@gmail.com |
| १७. | कॉर्पोरेट ऋणकोच्या एमएसएमई म्हणून नोंदणी स्थितीचे तपशील | माहिती उपलब्ध नाही |

दिनांकः १३ जून, २०२६
ठिकाणः मुंबई

आयपीई - एनपीव्ही इनसॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड
(पूर्वीची मंत्राह इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड)
द्वारे - त्यांचे संचालक श्री. अतुल टंडन, ठराव व्यावसायिक म्हणून नियुक्त
ग्रेव्हेक इन्व्हेस्टमेंट्स अँड फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात
आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPE-0040/IPA-2/2022-23/50021
एएफए वैधता दि. ३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत.
पत्रव्यवहाराकरिता ईमेलः cirp.grevekinvestment@gmail.com

**जाहीर सूचना**

सर्वसाधारण जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, **श्री. अल्ताफ मोहम्मद ददान** हे मुंबई येथे बनविलेल्या निवृत्ती सह पुनर्रचना करारनामा दिनांक २७ एप्रिल, २०२६ नुसार भागीदारी संस्था **मे. रॉयल रिअल्टी** मधून दि. ३१ मार्च, २०२६ पासून निवृत्त झाले आहेत.

सदर संस्था, मे. रॉयल रिअल्टी, पत्ता - खोली क्र. ६, १ला मजला, वझीर हाऊस, नवानगर, डॉकयार्ड रोड, माझगाव, मुंबई - ४०००१० यापुढे खालील व्यक्तींद्वारे :

i) **श्री. रिझवान मोहम्मद ददान** (कार्यरत भागीदार)
ii) **श्री. युसूफ रिझवान ददान** (आगामी भागीदार) मे. रॉयल रिअल्टी, परमनंट अकाऊंट नंबर (पॅन) AANFR3574P च्या त्याच नाव आणि शैलीमध्ये चालविण्यात येईल.

**तमाम जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते कीः**
१. श्री. अल्ताफ मोहम्मद ददान, निवृत्त भागीदार, हे गत, विद्यमान आणि भविष्यातील दायित्वे समाविष्ट असणाऱ्या, कोणत्याही समयी उद्भवणाऱ्या संस्थेच्या कोणत्याही कृती, करार, व्यवहार किंवा जबाबदाऱ्यांकरिता जबाबदार असणार नाहीत.
२. कार्यरत भागीदार आणि आगामी भागीदार हे सर्व संबंधित कालखंडाकरिता संस्थेच्या व्यवस्थापन, आचरण, व्यवहार, दायित्वे आणि जबाबदाऱ्यांकरिता संपूर्ण जबाबदार असतील.
३. संस्थेशी व्यवहार करणाऱ्या सर्व व्यक्तींना संस्थेच्या घटनेमधील वरील बदलाची नोंद घेण्याची याद्वारे सूचना देण्यात येत आहे.
४. संस्थेविरुद्ध कोणताही दावा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तींना याद्वारे त्याबाबत संस्थेस त्यांचे नोंदणीकृत कार्यालय म्हणजेच खोली क्र. ६, १ला मजला, वझीर हाऊस, नवानगर, डॉकयार्ड रोड, माझगाव, मुंबई - ४०००१० येथे सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सहाय्यक दस्तऐवजांसह लेखी स्वरुपात सूचित करण्याची विनंती आहे.

सदर सूचना संस्थेद्वारे सर्वसाधारण माहितीकरिता आणि भारतीय भागिदारी कायदा, १९३२ च्या कलम ७२ सह वाचावयाच्या कलम ३२(४) च्या तरतुदींच्या अनुपालनामध्ये पारित करण्यात आली आहे.

**मुंबई, दिनांक १३ जून, २०२६**

**मे. रॉयल रिअल्टी करिता त्यांच्या भागिदारांद्वारे**
सही/-
**श्री. रिझवान मोहम्मद ददान**
**(कार्यरत भागीदार)**
सही/-
**श्री. युसूफ रिझवान ददान**
**(आगामी भागीदार)**

**जाहीर सूचना**

सर्वसाधारण जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, **श्री. अल्ताफ मोहम्मद ददान** हे मुंबई येथे बनविलेल्या मे. रॉयल रिअल्टीच्या निवृत्ती सह पुनर्रचना करारनामा दिनांक २७ एप्रिल, २०२६ नुसार भागीदारी संस्था **मे. रॉयल रिअल्टी** मधून दि. ३१ मार्च, २०२६ पासून निवृत्त झाले आहेत.

सदर संस्था, मे. रॉयल रिअल्टी, पत्ता - खोली क्र. ६, १ला मजला, वझीर हाऊस, नवानगर, डॉकयार्ड रोड, माझगाव, मुंबई - ४०००१० यापुढे खालील व्यक्तींद्वारे :

i) **श्री. रिझवान मोहम्मद ददान** (कार्यरत भागीदार)
ii) **श्री. युसूफ रिझवान ददान** (आगामी भागीदार) मे. रॉयल रिअल्टी, परमनंट अकाऊंट नंबर AAOFR2062D च्या त्याच नाव आणि शैलीमध्ये चालविण्यात येईल.

**तमाम जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते कीः**
१. निवृत्त भागीदार, श्री. अल्ताफ मोहम्मद ददान, हे कोणत्याही समयी म्हणजेच भूतकाळ, वर्तमानकाळ किंवा भविष्यकाळातील संस्थेच्या कोणत्याही कृती, ऋण, दायित्वे, व्यवहार किंवा जबाबदाऱ्यांकरिता जबाबदार असणार नाहीत.
२. संस्थेशी व्यवहार करणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे खबरदार करण्यात येते की, निवृत्त होणाऱ्या भागीदाराच्या संदर्भात फर्मशी केलेले कोणतेही व्यवहार त्यांच्या स्वतःच्या जोखमीवर असतील.
३. संबंधित सर्व वेळी, भागीदारी संस्थेचे सर्व कामकाज, दायित्वे आणि जबाबदाऱ्यांसाठी कार्यरत भागीदार आणि आगामी भागीदार हेच पूर्णपणे जबाबदार असतील.
४. सदर संस्थेविरुद्ध किंवा निवृत्त भागिदाराविरुद्ध संस्थेच्या संदर्भात कोणताही दावा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने त्याबाबत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, वायएमके लीगल, कार्यालय क्र. १२, १ला मजला, अजयदीप बिल्डींग, २४० पेरिनरिमन रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे सूचित करणे आवश्यक आहे. असे न केल्यास असे दावे, जर असल्यास, सोडून दिले असे समजण्यात येईल.

सदर सूचना सर्वसाधारण जनतेच्या माहितीकरिता आणि भविष्यातील कोणत्याही विवाद किंवा दावे टाळण्याकरिता आणि भारतीय भागिदारी कायदा, १९३२ च्या कलम ७२ सह वाचावयाच्या कलम ३२(४) च्या तरतुदींच्या अनुपालनामध्ये पारित करण्यात आली आहे.

**मुंबई, दिनांक १३ जून, २०२६**

सही/-
**वायएमके लीगल**
**अल्ताफ मोहम्मद ददान यांच्याकरिता ॲडव्होकेट**

# आशियाई स्पर्धेचे सुवर्णवीर जसपाल राणांचे ४९ व्या वर्षी निधन

■ नवी दिल्ली

**भारताचे** दिग्गज नेमबाज, आशियाई स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते आणि प्रसिद्ध प्रशिक्षक जसपाल राणा (४९) यांचे आज निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय नेमबाजी क्षेत्रावर शोककळा पसरली असून क्रीडा विश्वातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

१ जून रोजी जर्मनीतील म्युनिकहून भारतात परतताना विमान प्रवासादरम्यान त्यांची प्रकृती अचानक बिघडली होती. मायदेशी परतल्यानंतर त्यांना तातडीने दिल्लीतील मॅक्स साकेत रुग्णालयात दाखल केले. तपासणीनंतर



त्यांच्यावर स्टेंट बसविण्याची शस्त्रक्रिया झाली होती. मात्र उपचार सुरू असतानाच आज सकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. राष्ट्रीय रायफल असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष असलेल्या कलिकेश नारायण सिंह देव यांनी राणा यांच्या निधनाबद्दल माहिती देत दुःख व्यक्त केले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

जसपाल राणा हे भारताच्या नेमबाजी इतिहासातील सर्वात यशस्वी खेळाडूंपैकी एक मानले जातात. त्यांनी आशियाई स्पर्धेत एकूण आठ पदके जिंकली होती. यामध्ये चार सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन कांस्य पदकांचा समावेश आहे. तसेच राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी १५ पदके पटकावली होती. त्यापैकी नऊ सुवर्ण, चार रौप्य आणि दोन कांस्य पदके होती. खेळाडू म्हणून कारकिर्दीनंतर ते ज्युनियर संघाचे प्रशिक्षक म्हणून कार्यरत होते. फेब्रुवारी २०२५ पासून ते भारताच्या २५ मीटर पिस्तूल प्रकाराचे हाय-परफॉर्मन्स कोच होते.

देश विदेश

# नायजेरियाची द.आफ्रिकेतून लोकांना मायदेशी आणण्याची मोहीम सुरू

■ जोहान्सबर्ग

**दक्षिण** आफ्रिकेत वाढत्या स्थलांतरविरोधी हिंसेमुळे आणि सुरक्षेच्या कारणास्तव नायजेरिया सरकारने आपल्या नागरिकांना मायदेशी परत आणण्याची मोहीम हाती घेतली. नायजेरियाने आपल्या नागरिकांसाठी पाच विशेष विमान उड्डाणास मंजूर दिली. त्यापैकी पहिल्या तुकडीत २७० हून अधिक नागरिक जोहान्सबर्गमधून लागोसला सुरक्षित पोहोचले.

दक्षिण आफ्रिकेत बेरोजगारीचे प्रमाण ३० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याने स्थानिक संघटनांनी कागदपत्र नसलेल्या स्थलांतरितांवर नोकऱ्या हिरावून घेतल्याचा आरोप केला आहे. दक्षिण आफ्रिकेत 'ऑपरेशन डुडुला' सारख्या स्थलांतरविरोधी संघटनांनी परदेशी नागरिकांना ३०



जूनची अंतिम मुदत दिली असून, परदेशी लोकांवर हल्ले करणे व दुकाने लुटणे अशा घटना घडल्या आहेत. नायजेरियाशिवाय घाना, मोझांबिक आणि मलावी यांसारख्या आफ्रिकन देशांनीही आपल्या नागरिकांना दक्षिण आफ्रिकेतून बाहेर काढले आहे.

# कॅलिफोर्नियात ९५४ कोटींची फसवणूक भारतीय वंशाच्या उद्योगपतीला अटक

■ कॅलिफोर्निया



**अमेरिकेतील** भारतीय वंशाचे उद्योगपती व फायनान्सर महेंद्र मखीजानी यांना आर्थिक फसवणूक, गैरव्यवहार आणि ब्लॅकमेलिंगच्या गंभीर आरोपांखाली अटक करण्यात आली आहे. कॅलिफोर्नियातील न्यूपोर्ट बीच येथील त्यांच्या आलिशान निवासस्थानी बुधवारी पहाटे धाड टाकून ही कारवाई करण्यात आली. एका अमेरिकन बँकेची सुमारे १०० दशलक्ष डॉलर्स (अंदाजे ९५४ कोटी रुपये) फसवणूक केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.

महेंद्र मखीजानी हे मूळचे भारतीय वंशाचे असून, ते अमेरिकेत ग्रीन कार्डच्या आधारे वास्तव्यास होते. न्यूपोर्ट बीच येथे ते कँटर ग्रुप एलएलसी नावाची कंपनी चालवत होते. रिअल इस्टेट व्यवहारांसाठी एका स्थानिक बँकेने त्यांच्या कंपनीला मोठ्या प्रमाणावर कर्ज दिले होते. हे कर्ज व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून परत करण्याचे ठरले होते. मखीजानी यांनी अनेक बोगस कंपन्यांचे जाळे उभारून आर्थिक अफरातफर केली.

# मणिपुरात बेपत्ता असलेल्या ६ नागा नागरिकांची हत्या

■ कोहिमा

**मणिपूरमध्ये** पुन्हा एकदा हिंसाचार आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. तब्बल २८ दिवसांपासून बेपत्ता असलेल्या सहा नागा नागरिकांचे मृतदेह कांगपोकपी जिल्ह्यात सापडल्याने राज्यभर खळबळ उडाली आहे. या हत्येच्या घटनेनंतर नागा समाजात संतापाची लाट उसळली.अनेक भागांमध्ये बंदची हाक देण्यात आली होती.

गेल्या महिन्यात १३ मे रोजी कांगपोकर्पी जिल्ह्यातील लिलोन वैफेई गावातून या सहा जणांचे अपहरण करण्यात आले होते. त्यानंतर ते बेपत्ता होते. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांचा शोध सुरू होता. दरम्यानच्या काळात नागा संघटनांनी ओलीस ठेवलेल्या १४ जणांची सुरक्षित सुटका केली होती. त्यानंतर ही हत्येची घटना घडली आहे. मणिपूर पोलीस, आसाम रायफल्स आणि सीआरपीएफच्या संयुक्त पथकांनी राबवलेल्या मोठ्या शोधमोहिमेनंतर हे मृतदेह सापडले. मणिपूरचे पोलीस महासंचालक मुकेश सिंह यांनी सांगितले की, जवळपास १५ पथकांनी २४ तास अखंड शोधमोहीम राबवली.

# निवडणूक सभेतील भाषणावरून ममता यांच्याविरोधात तक्रार

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याविरोधात निवडणूक सभेतील भाषणावरून कोलकाता सेंट्रल डिव्हिजनमधील हरे स्ट्रीट पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल झाला. या कारवाईनंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले. तृणमूलने हा एफआयआर राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप करत विरोध केला आहे. तुषार कांती दास यांच्या तक्रारीनुसार, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोलकात्यात ९ मार्च रोजी एस्प्लेनेड परिसरातील मेट्रो चॅनलजवळ झालेल्या सभेत ममता बॅनर्जी यांनी समाजात तणाव निर्माण होईल, असे वक्तव्य केले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रार दाखल झाली असून तपास सुरू करण्यात आला आहे. भाषणाचा आशय, पार्श्वभूमी व संदर्भ यांची सखोल चौकशी केली जात आहे.

# इरावान देवस्थान बॉम्बस्फोट प्रकरण! २ दोषींना फाशीची शिक्षा ठोठावली

■ बँकॉक

**बँकॉक** येथील इरावान देवस्थान बॉम्बस्फोट प्रकरणी थायलंड न्यायालयाने चीनच्या शिंजियांग प्रांतातील उइगर समुदायाच्या २ जणांना फाशीची शिक्षा ठोठावली. दोषींनी आपल्यावर गुन्हे नाकारले असून, ते या शिक्षेविरुद्ध उच्च न्यायालयात अपील करणार आहेत. इरावान देवस्थान येथे १७ ऑगस्ट २०१५ रोजी भीषण बॉम्बस्फोट झाला आणि त्यात २० जणांचा मृत्यू झाला होता.

बिलाल मोहम्मद (अदेम करादाग) आणि युसूफ मिरेइली अशी फाशी झालेल्या दोषींची नावे आहेत. न्यायालयाने दोषींना पूर्वनियोजित हत्येचा आणि स्फोटके बाळगल्याने दोषी ठरवत फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. कोरोना महामारी, साक्षीदारांची मोठी संख्या आणि योग्य भाषांतरकाराची कमतरतामुळे या खटल्याचा निकाल १० वर्षांहून अधिक काळ लांबणीवर पडला होता. मानवाधिकार संघटनांनी या प्रक्रियेवर ताशेरे ओढले आहेत, तर चीनने या निकालाचे स्वागत केले आहे. सुरक्षा तज्ज्ञांच्या मते थायलंडच्या तत्कालीन सरकारने १०० हून अधिक उइगर निर्वासितांना चीनकडे बळजबरीने सोपवले होते. त्याचाच बदला घेण्यासाठी हा दहशतवादी हल्ला चीनच्या पर्यटकांना लक्ष्य करून करण्यात आला असावा, असा अंदाज आहे.

# मातोश्रीवर उद्धव ठाकरेंची सोनम वांगचुक यांच्याशी भेट

■ मुंबई

**लडाखमधील** प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी आज मुंबईतील 'मातोश्री' निवासस्थानी उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीमुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चांना उधाण आले.

या भेटीवेळी आमदार आदित्य ठाकरे, खासदार अनिल देसाई यांच्यासह पक्षाचे काही पदाधिकारी उपस्थित होते. उद्धव ठाकरे यांनी सोनम वांगचुक यांचे स्वागत करत त्यांना



छत्रपती शिवाजी महाराजांचा आकर्षक पुतळा भेट म्हणून दिला. वांगचुक यांनीही या सन्मानाबद्दल आनंद व्यक्त केला. मातोश्रीवरील या भेटीदरम्यान विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राष्ट्रीय विषयांवर चर्चा झाल्याची माहिती आहे. नीट आणि सीबीएससी पेपर घोटाळ्यानंतर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी कॉकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वात आंदोलने सुरू आहेत.

# लातूरच्या शेतकऱ्याला राज्य सरकारने दिलेला बैल आजारी

पान ८ वरून

झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार प्रशासनाने गायकवाड यांना स्थानिक गोशाळेतून एक बैल उपलब्ध करून दिला. मात्र, हा बैल दोनच दिवसांत आजारी पडला. यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी टीका करत लिहिले की, विरोधक आणि माध्यमांच्या दबावामुळे लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्याला नुकसानभरपाई म्हणून दिलेला बैल आजारी निघाला.

शेतकरी कर्जमाफीची अवस्थाही यापेक्षा वेगळी नाही. द्यायची म्हणून दिलेल्या कर्जमाफीमध्ये अटीशर्तीच जास्त लादून ती बहुतांश शेतकऱ्यांना मिळू नये याची अधिक काळजी घेतली. आता बैलावर उपचारासाठी स्वतःच्या खिशातील पैसे खर्च करण्याची वेळ संबंधित शेतकऱ्यावर आली. त्याप्रमाणेच कर्जमाफीसाठीही सरकारने घातलेल्या अटींमुळे आधी स्वतःकडचे पैसे शेतकऱ्यांना भरावे लागणार आहेत. यातून या सरकारच्या नियतीतच खोट आहे, हे दिसते. त्यामुळे आमची सरकारला विनंती आहे की, अन्नदात्याला द्यायचे ते हातचे राखून देऊ नका, तर निर्मळ आणि मोकळ्या मनानेच द्या! शेवटी तिजोरी ही जनतेची आहे.


## कामगारांसाठी जाहीर सुचना/नोटीस

या जाहीरातीद्वारे कळविण्यात येत की, आम्ही **१. अचल अक्षवाल, अध्यक्ष, २. श्री योगेश पारीख, खजिनदार तथा सचिव मे. जयवंत इंडस्ट्रियल प्रिमायसेस को. ऑप. सो. लि., सी एस नं. १/४०४, ६३, ताडदेव, मुंबई – ४०० ०३४.** सदर इस्टेटमधील काही आस्थापना बंद झालेल्या असुन कार्यरत तीन आस्थापना वेगवेगळ्या ठिकाणी कामगारांसह दि.३१.१२.२०२५ रोजी स्थलांतर झालेल्या आहेत. सदर जागेचे क्षेत्रफळ **२७३४.६६ चौ. मी.** असुन तत्सम डिव्हीजन ताडदेव न गर भुमापन कार्यालयातील नोंदीनुसार मिळकतीचे मालक आहोत तसेच सदर मिळकतीचा विद्यमान वापर बदलुन मिळकत विकसित व विक्री करण्याचे आम्ही प्रस्तावित करीत आहोत. तरीदेखील **मे. जयवंत इंडस्ट्रियल प्रिमायसेस को. ऑप. सो. लि., सी एस नं. १/४०४, ६३, ताडदेव, मुंबई – ४०० ०३४.** या आस्थापनेत पुर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार, कर्मचारी, तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापक व विकासकाच्या विरुद्ध असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्राच्या पुराव्यासहित कामगार उप आयुक्त, मुंबई शहर यांचे कार्यालय, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांच्याकडे जाहिर नोटीस/सुचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासुन १५ दिवसाच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, व त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाही.

सही–
स्थळ–मुंबई
दिनांक–१३/०६/२०२६
मे. जयवंत इंडस्ट्रियल प्रिमायसेस को. ऑप. सो. लि.,
(अध्यक्ष/सचिव)



## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र.:- का. अ. (शहर)/ मुं.झो.सु. मंडळ/ई -निविदा/०२/२६-२७ (२ री बोली)**

कार्यकारी अभियंता (शहर) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२-६६४०५४८४) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकूण ०१ कामाकरीता **बी-१** (टक्केवारी) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई-निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ http://mahatenders.gov.in वर उपलब्ध असतील. निविदा विक्री **दिनांक** १५.०६.२०२६ **दुपारी १.०० पासून दिनांक** २२.०६.२०२६ **सायंकाळी १५.०० पर्यंत राहील.** निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर), मुं. झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (शहर),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

CPRO/A/457

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial



## फॉर्म सी
(नियम ९ (१) पहा)
जाहीर सूचना

*(नादारी आणि दिवाळखोरी (कॉर्पोरेट ऋणकोच्या वैयक्तिक जामीनदारासाठी दिवाळखोरी प्रक्रियेकरिता न्यायनिर्णय प्राधिकरणाकडे अर्ज) नियम, २०१९ च्या नियम ९(१) अंतर्गत)*

**मे. शेरॉन बायो-मेडिसिन लिमिटेडचे श्री. ललित मिश्रा यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ-२ ने, नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या कलम ६० अन्वये आपल्या अधिकारक्षेत्राचा वापर करून, दिनांक २४.०२.२०२६ च्या आदेशान्वये, श्री. ललित मिश्रा, राहणार- १०१/१०२, पहिला मजला, प्रोग्रेसिव्ह सी ब्रीझ लाउंज, सेक्टर १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ यांच्याविरुद्ध दिवाळखोरी प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला आहे.

श्री. ललित मिश्रा यांच्या धनकोंना याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की त्यांनी त्यांचे दावे, समर्थनीय पुराव्यांसह, दिनांक २०.०६.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी, दिवाळखोरी विश्वस्त, श्री. महेश सुरेका, १७३, उद्योग भवन, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३ येथे सादर करावेत.

दावे सादर करण्याची अंतिम तारीख २०.०६.२०२६ आहे.

धनकोंनी त्यांचे दावे इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे lalitmisrabankruptcy@gmail.com या ईमेल पत्त्यावर, किंवा प्रत्यक्ष सुपुर्दगी, नोंदणीकृत टपाल, स्पीड पोस्ट किंवा कुरिअरद्वारे सादर करावेत.

| अतिरिक्त तपशील | | |
|---|---|---|
| १. | दिवाळखोरी विश्वस्त म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | महेश आर सुरेका<br>आयपी क्र.<br>IBBI/IPA-001/IP-P00413/2017-18/10736 |
| २. | मंडळाकडे नोंदणीकृत दिवाळखोरी विश्वस्ताचा पत्ता, ई-मेल आणि मोबाईल क्रमांक | १७३, उद्योग भवन, सोनावाला रोड, गोरेगाव पूर्व, मुंबई - ४०००६३<br>कार्यवाहीसाठी ईमेल: lalitmisrabankruptcy@gmail.com<br>ईमेल: mahesh@mrsureka.com<br>मोबाइल:+९१ ९३२२५ ८१४१४ |

**टीप-** खोटे किंवा दिशाभूल करणारे दाव्याचे पुरावे सादर केल्यास नादारी आणि दिवाळखोरी आणि संहिता २०१६ आणि इतर कोणत्याही लागू कायद्यांच्या तरतुदींनुसार दंड किंवा तुरुंगवास होऊ शकतो.

**महेश आर सुरेका**
**श्री. ललित मिश्रा यांची दिवाळखोरी विश्वस्त**
**सीपी(आयबी) ६१/एमबी/२०२६ मध्ये नियुक्ती**
IBBI/IPA-001/IPA-001/IP-P00413/2017-18/10736
**एएफए वैधता- ३१.१२.२०२६**
**१७३, उद्योग भवन, सोनावाला रोड, गोरेगाव पूर्व ४०००६३**
mahesh@mrsureka.com | ९३२२५८१४१४ |



## निविदा सूचना

**दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी मर्यादित, मुंबई.**
(रजि. क्र.: बी.ओ.एम. / आर. एस. आर. / ३५४/३-६ - १९६७ )
६६/८०, युनियन बँक बिल्डींग, ४ था मजला, खो. क्र. १९, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१. फोन : २२६७७७१८ / २२६२९४८४, ०९८३३१८५५८४
Email: ubicrsoc@gmail.com Web.: www.unionbankcreditsociety.com

या संस्थेला खाली उल्लेखित सुविधायुक्त लोणावळा येथील विश्रामगृहासोबत (रिसॉर्ट/हॉटेल) २५० एसी रुमनाईट एक वर्षासाठी भाडे तत्वावर करार करुन घेणे आहेत. तरी सोमवार दिनांक २०-०६-२०२६ रोजी संध्याकाळी ०४:३०वाजेपर्यंत निविदा मागवीत आहे. तरी इच्छूक हॉटेल / रिसॉर्ट मालकांनी आपली निविदा (सेवाशुल्कासह) प्रत्यक्ष किंवा पोस्टाने दिलेल्या वेळेत पोहोचतील अशा प्रकारे पाठवणे. उशिरा आलेली कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच या निविदेमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्याचा अधिकार संचालक मंडळ राखून ठेवत आहे.

**सर्वसाधारण अटी / शर्ती :**
१) खोलीची क्षमता चार व्यक्तींसाठी असावी.
२) विनाशुल्क चहा व नाश्त्याची सुविधा असावी.
३) जेवणाच्या बिलावर सूट दिल्यास प्राधान्य.
४) स्विमिंग पुल असल्यास प्राधान्य.
५) पार्किंग सुविधा उपलब्ध असावी.
६) २५ लोक समाविष्ट होतील असा कॉन्फरेंस हॉल असावा.
७) इतर काही बाबी असल्यास त्याची चर्चा करारपत्र करताना करण्यात येईल.

**दिनांक : १२-०६-२०२६**
**ठिकाण : मुंबई**
शिक्का
**सही /-**
**(श्री. प्रशांत सं. सुर्वे)**
**मानद सचिव**



## फॉर्म ए
जाहीर घोषणा

*(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ६ अन्वये)*

**एचके टोल रोड प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशिल | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **एचके टोल रोड प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | १९ मे २०१० |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | आरओसी मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र. / मर्यादित दायित्व ओळख क्र. | U45203MH2010PTC203370 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | **नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता:** रिलायन्स सेंटर, १९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅल्लार्ड इस्टेट, मुंबई, महाराष्ट्र - ४००००१ |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | ११ जून २०२६ |
| ७. | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | ०७ डिसेंबर २०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | **श्री. संजय कुमार मिश्रा**<br>आयबीबीआय नोंदणी क्र.:<br>IBBI/IPA-001/IP-P01047/2017-2018/11730 |
| ९. | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | ड्रीम्स कॉम्प्लेक्स, ४सी- १६०५, एलबीएस मार्ग, भांडुप (प), मुंबई - ७८<br>ईमेल आयडी: ipsanjaymishra@rediffmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल | ३०४, द समिट, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, विले पार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७.<br>ईमेल आयडी: cirp.hktollroad@gmail.com |
| ११. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | २६ जून २०२६ |
| १२. | कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग | लागू नाही |
| १३. | वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित फॉर्म आणि<br>(ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत: | (अ) संबंधित फॉर्म्स येथे उपलब्ध आहे : https://ibbi.gov.in/downloadform.html<br>(ब) लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ ६ ने **एचके टोल रोड प्रायव्हेट लिमिटेड**च्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेला **११ जून २०२६** रोजी सुरू करण्याचा आदेश दिला आहे.
**एचके टोल रोड प्रायव्हेट लिमिटेड**च्या धनकोंना येथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यांसह **२६ जून २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी बाब क्र.१० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत.
वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात.
**दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.**

**दिनांक: १३ जून २०२६**
**ठिकाण: मुंबई**
**संजय कुमार मिश्रा**
(IBBI/IPA-001/IP-P01047/2017-2018/11730)
एचके टोल रोड प्रायव्हेट लिमिटेडसाठी अंतरिम ठराव व्यावसायिक
ईमेल - cirp.hktollroad@gmail.com
एएफए: एए१/११७३०/०२/३००६२७/१०८९७६ (वैधता ३०.०६.२०२७ पर्यंत)



## जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनामध्ये)

नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, ४था मजला, डिव्हाईन चाईल्ड हायस्कूलसमोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३. सीआयएनः L99999MH1992PLC066213
(माननीय एनसीएलटीच्या आदेश दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ नुसार परिसमापनाअंतर्गत कंपनी)

**ई-लिलावाकरिता जाहीर उद्घोषणा**
**नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ आणि त्याअंतर्गत बनलेल्या विनियमनांच्या अंतर्गत सूचना**

निम्नस्वाक्षरीकारांद्वारे तमाम जनतेस याद्वारे ई-लिलावाची सूचना देण्यात येते की, नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ (**"आयबीसी"**) च्या तरतुदी सहवाचिता त्याअंतर्गत बनविलेले नियम आणि विनियमनांनुसार कॉर्पोरेट ऋणकोच्या परिसमापन संपत्तीचा भाग बनलेल्या **जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनामध्ये) ("कॉर्पोरेट ऋणको")** च्या मालकीच्या ३ मालमत्तांच्या (खालील तक्त्यामध्ये वर्णन केलेल्या) 'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे', 'जसे आहे तसेच आहे', 'तेथे जे आहे', 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर', कोणत्याही प्रतिनिधित्व, हमी किंवा नुकसानभरपाईशिवाय विक्रीकरिता बोली आमंत्रित करण्यात येत आहेत.

विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे इतर बाबींसोबतच आयबीबीआय (विनियमन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३२ आणि मालमत्ता विक्री प्रक्रिया ज्ञापनपत्र दिनांक १३ जून, २०२६ (**"एएसपीएम"**) नुसार ई-लिलाव प्लॅटफॉर्म बँकनेट (पूर्वीचा ईबीक्रय) https://ibbi.baanknet.com (**"ई-लिलाव प्लॅटफॉर्म"**) द्वारे करण्यात येईल. सर्व संभाव्य बोलीदारांना नोंद घेण्याची विनंती करण्यात येते की, सर्व पात्रता दस्तऐवज आणि इसारा रक्कम अनामत एएसपीएमच्या खंड ४ (पात्रता दस्तऐवज) मध्ये नमूद केलेल्या दस्तऐवज सादरीकरण आवश्यकतांनुसार अनिवार्यपणे आणि फक्त ई-लिलाव प्लॅटफॉर्मवरच सादर करावे.

| ई-लिलावाच्या महत्त्वाच्या दिनांकांचे वेळापत्रक | |
|---|---|
| ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर पात्रता दस्तऐवज आणि कलम २९ए हमी सादर करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ | **बुधवार, दि. १५ जुलै, २०२६, सायं. ५.०० (यूटीसी+५:३०)** |
| ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर इसारा रक्कम अनामत (**"ईएमडी"**) जमा करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ | **बुधवार, दि. १५ जुलै, २०२६, सायं. ८.०० (यूटीसी+५:३०)** |
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | **शनिवार, दि. १८ जुलै, २०२६, स. ९:०० ते सायं. ७:०० (यूटीसी+५:३०)** |
| अंतिम विक्री मोबदला भरणा करण्याचा अंतिम दिनांक | निम्नस्वाक्षरीकारांद्वारे अंतिम विक्री मोबदला भरणा करण्याकरिता मागणी पत्र पारित केल्यापासून साठ (६०) दिवसांमध्ये |

| अ. क्र. | मालमत्तेचे वर्णन | असेट आयडी | लिलाव आयडी | राखीव किंमत* | इसारा रक्कम अनामत (ईएमडी) | विस्तारयोग्य मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हैदराबाद येथे स्थित विमान बोईंग-बी७३७-८००- एमएसएन- ३५०८३ - व्हीटी-जेबीजी; एलएच इंजिन - ९६११३५; आरएच इंजिन - ८९६३४४; एपीयू - हनीवेल पी-५२१६ | ४११८ | ३८८७ | **७०,६४,००,०००** | ७,०६,४०,००० | ३,५३,२०,००० |
| २ | मुंबई येथे स्थित विमान बोईंग-बी७३७-८००- एमएसएन- ३५६५१ - व्हीटी-जेबीएल; एलएच इंजिन - ८९६३५३; आरएच इंजिन - ८९४८९३; एपीयू - हनीवेल पी-७८२३ | ४१२२ | ३८८८ | **९०,०२,००,०००** | ९,००,२०,००० | ४,५०,१०,००० |
| ३ | दिल्ली येथे स्थित विमान बोईंग-बी७३७-९००- एमएसएन- ३३७४० - व्हीटी-जेजीडी; एलएच इंजिन - ९६११२६; आरएच इंजिन - उपलब्ध नाही; एपीयू - उपलब्ध नाही | ४१७९ | ३८८९ | **४,९३,५०,०००** | ४९,३५,००० | २४,६७,५०० |

*इतर गोष्टींबरोबरच कर, आकारणी, प्रभार, शुल्क, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि एएसपीएमच्या खंड १९ (शुल्क, खर्च आणि कर आकारणी) मध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केल्यानुसार, विक्री पूर्ण करण्यासाठी लागू असलेले सर्व आवश्यक खर्च वगळता. निम्न स्वाक्षरीकारांकडून कोणतेही प्रतिनिधित्वे, हमी आणि नुकसानभरपाई दिली जाणार नाही (संबंधित एएसपीएममध्ये वर्णन केल्यानुसार).

**महत्त्वाच्या टिपा:**
१. बँकनेट पोर्टलवर वरील सुचीबद्ध तीन (३) मालमत्तांकरिता तीन (३) स्वतंत्र ई-लिलाव घेण्यात येतील.
२. ही विक्री सूचना बँकनेट येथे वरील मालमत्ता आणि लिलाव आयडीसमोर https://ibbi.baanknet.com/eauction ibbi/auc-listing येथे किंवा कॉर्पोरेट ऋणकोच्या वेबसाईट www.jetairways.com येथे उपलब्ध असलेल्या, मालमत्तेची माहिती, घोषणापत्र, प्रतिज्ञापत्र आणि आयबीसीच्या कलम २९अ अंतर्गत पात्रतेसाठी हमीपत्र आणि 'ई-लिलाव विक्रीच्या सामान्य आणि तांत्रिक अटी आणि शर्ती' समाविष्ट असलेल्या संबंधित एएसपीएमसह वाचावी.
३. सर्व परदेशी बोलीदारांनी त्यांच्या सहभागाकरिता संबंधित एएसपीएमच्या शुद्धीपत्रकाची नोंद घ्यावी. परदेशी बोलीदारांना दि. १३ जून, २०२६ रोजीच्या संबंधित एएसपीएमच्या जोडपत्रामध्ये दिलेल्या निर्दिष्ट नोंदणी प्रक्रिया, वेळेच्या मर्यादा, पात्रता निकष आणि ईएमडीचे सादरीकरण यांचे पालन करण्याची विशेष विनंती करण्यात येत आहे.
४. संभाव्य बोलीदारांनी आवश्यक पात्रता दस्तऐवज आणि ईएमडी फक्त आणि अनिवार्यपणे ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे, एएसपीएमच्या खंड ४ (पात्रता दस्तऐवज) नुसार निर्धारित वेळमर्यादेमध्ये सादर करावेत आणि परिसमापकाकडे करू नयेत.
५. ई-लिलाव प्लॅटफॉर्मसंबंधी आणि त्याच्या दस्तऐवज आणि ईएमडी जमा करण्यासंबंधी कोणत्याही चौकशीकरिता, संभाव्य बोलीदारांनी **बँकनेटला +९१ ८२९१२२०२२० आणि** support.baanknet@psballiance.com येथे संपर्क साधावा अशी त्यांना विनंती करण्यात येते.
६. ई-लिलावासंबंधी कोणत्याही चौकशीकरिता, कृपया परिसमापकांचे अधिकृत प्रतिनिधी **श्री. निखिल लेले** (+९१-९९२३६९५६५६) यांना "Aviation Assets Sale - B737" या विषयासह jetliquidation@in.ey.com आणि liquidation.jet@gmail.com वर संपर्क साधावा. कृपया नोंद घ्यावी की, पात्रता दस्तऐवजाशी संबंधित कोणतेही दस्तऐवज परिसमापक, त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांचे सल्लागार यांच्याकडे सादर करू नयेत.
७. हे स्पष्ट करण्यात येते की, ही सूचना विक्री करण्यासाठी निम्नस्वाक्षरीकारांकडून किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापक) कडून कोणत्याही प्रकारचे बंधनकारक दायित्व निर्माण करत नाही. निम्नस्वाक्षरीकारांनी घेतलेला कोणताही निर्णय अंतिम असेल आणि सर्व संभाव्य बोलीदारांवर बंधनकारक असेल.
८. असे स्पष्ट करण्यात येते की, येथे आणि संबंधित एएसपीएममध्ये नमूद केलेल्या मालमत्तांचे तपशील केवळ सामान्य संदर्भासाठीच प्रदान केले आहेत. नुकसानभरपाईसाठी पात्र पक्षकार (एएसपीएममध्ये परिभाषित केल्यानुसार) स्पष्टपणे नाकारण्यात येत आहेत आणि मालमत्तेच्या वर्णनात किंवा स्थितीमध्ये असलेल्या कोणत्याही फरक/अचूकतेचा अभाव/विसंगती/चुकीचे विधान/वगळणे/बदल/कमतरता किंवा कोणत्याही प्रकारच्या त्रुटीसाठी कोणतीही जबाबदारी किंवा उत्तरदायित्व स्वीकारणार नाहीत, मग ती त्रुटी ई-लिलाव पूर्ण होण्यापूर्वी, दरम्यान किंवा नंतर आढळली असो किंवा नसो. मालमत्तेची विक्री पूर्णपणे 'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे', 'जसे आहे तसे' आणि 'कोणत्याही आधाराशिवाय' या तत्त्वावर आणि कोणतेही प्रतिनिधित्व, हमी किंवा नुकसानभरपाई शिवाय करण्यात येईल.
९. विक्रीच्या अंतिम रकमेचा भरणा हा एएसपीएममधील कलम १५ (विक्रीच्या अंतिम रकमेचा भरणा) आणि कलम १६ (विक्रीची पूर्तता) मध्ये नमूद केलेल्या कालमर्यादा, व्याजाविषयक तरतुदी आणि रक्कम जप्त करण्याच्या अटींच्या अधीन असेल.
१०. लागू कायद्यांतर्गत अन्यथा तरतूद केल्याखेरीज, परिसमापकाला सीओसीच्या सल्ल्यानुसार, कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर ई-लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा थांबवण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

**सही/-**
**सतिश कुमार गुप्ता**
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे परिसमापक
आयपी नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00023/2016-17/10056
एएफए क्र. AA1/10056/02/311226/108454
एएफए वैधता दि. ३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत
ईमेलः **liquidation.jet@gmail.com**

**दिनांकः १३.०६.२०२६**
**ठिकाणः मुंबई**



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई निविदा सूचना क्रमांक** २०/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | दिघी बंदर-आधारित औद्योगिक क्षेत्रात क्रिटीकल मिनरल प्रक्रिया पार्क विकसित करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव-विनंती अर्ज. | --- |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक १५/०६/२०२६ ते दिनांक २२/०६/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १६/०६/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक १७/०६/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



## MAHATRANSCO — e-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-11/26-27 7000040273 | Work of supply & application of Nano Technology based Acid & Alkali resistant Nano modified anticorrosive coating on Gantry & equipment support structure & painting of MB DB at 400 kV Nagothane substation. **Tender Fee: Rs. 5,000/- + GST.** | Rs. 188.81 Lakhs Including Taxes |

EMD 1 % of estimated cost. **Submission of bids from 12.06.2026 at 11:00 Hrs. to 29.06.2026 up to 11:00 hrs, Opening date: 29.06.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm)
Mob. No. 8412050202 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer, EHV (O&M) Circle, Panvel**



# कॅटरीना झळकणार ‘चांदनी बार-२’मध्ये ?


**मधुर** भांडारकर दिग्दर्शित २००१ मधील गाजलेल्या आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या ‘चांदनी बार’या चित्रपटाच्या सिक्केलची म्हणजेच ‘चांदनी बार २’ची घोषणा झाल्यापासून चित्रपटसृष्टीत उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. या चित्रपटात तब्बूच्या जोडीला अभिनेत्री कतरिना कैफ मुख्य भूमिकेत दिसणार असल्याचे सांगितले जात आहे. या चित्रपटाच्या संहितेचे काम पूर्ण होत आले असून, मनोरंजन विश्वात आणि सोशल मीडियावर चाहत्यांकडून कतरिना कैफ या चित्रपटात तब्बूच्या सोबत स्क्रिन शेअर करू शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. पहिल्या भागात तब्बूने साकारलेली मुमताज ही डान्सरची भूमिका प्रचंड गाजली होती. आता दुसऱ्या भागात कतरिनाच्या नावाभोवती सध्या चर्चांचे मोठे मोहोळ निर्माण झाले आहे.

कतरिनाने यापूर्वी तब्बू सोबत ‘फितूर’ चित्रपटात काम केले असून, नुकत्याच आलेल्या ‘मेरी ख्रिसमस’ चित्रपटातील तिच्या अभिनयाचे कौतुक झाले होते. त्यामुळे ती अशा संवेदनशील चित्रपटाचा भाग होणार का, याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

# ‘जेलर २’ मध्ये शाहरुख नव्हे हृतिक!

**दाक्षिणात्य** सुपरस्टार रजनीकांत यांच्या ‘जेलर २’ या बहुप्रतीक्षित चित्रपटातील विशेष भूमिकेवरून गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. या चित्रपटात शाहरूख खान नव्हे, तर हृतिक रोशन महत्त्वाच्या कॅमियो भूमिकेत दिसणार असल्याचे समोर आले आहे.

याआधी या विशेष भूमिकेसाठी शाहरूख खानच्या नावाची जोरदार चर्चा होती. मात्र त्याच्या आगामी ‘किंग’ या चित्रपटाच्या व्यस्त वेळापत्रकामुळे त्याने या प्रकल्पातून माघार घेतली. शाहरूखने या भूमिकेला नकार दिल्यानंतर मेकर्सने हृतिक रोशनशी संपर्क साधला आणि आता हृतिक या चित्रपटाचा भाग होण्यासाठी सज्ज झाला आहे. हृतिक २२ आणि २३ जून रोजी चेन्नईमध्ये आपल्या भागाचे चित्रीकरण करणार आहे. हा कॅमियो केवळ नावापुरता नसून चित्रपटाच्या कथेला महत्त्वाचे वळण देणारा असेल. रजनीकांत यांनी साकारलेल्या टायगर मुथुवेल पांडियन या पात्राला एका कठीण प्रसंगात मदत करणारी हृतिकची ही भूमिका असेल. यासाठी त्याची विशेष लुक टेस्टही घेतली जाणार आहे. या कास्टिंगमुळे तब्बल ४० वर्षांनंतर एक रंजक योग जुळून आला आहे. हृतिक रोशनने



१९८६मध्ये आलेल्या ‘भगवान दादा’ या चित्रपटात बालकलाकार म्हणून काम केले होते. यामध्ये त्याने रजनीकांत यांच्या दत्तक मुलाची भूमिका साकारली होती. आता पुन्हा ही जोडी पडद्यावर झळकणार आहे.





# ‘धमाल-४’ पोस्टरचे अनोखे अनावरण

**‘धमाल ४’** या बहुप्रतीक्षित चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्चसाठी निर्मात्यांनी एक अत्यंत अनोखी आणि भव्य योजना आखली आहे. या चित्रपटाचा ट्रेलर मुंबईजवळील प्रसिद्ध ‘इमॅजिका’ अम्यूजमेंट पार्कमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे. नेहमीच्या पारंपारिक पद्धतीपेक्षा वेगळा अनुभव देण्यासाठी निर्मात्यांनी या मनोरंजक ठिकाणाची निवड केली आहे.

या भव्य सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे चित्रपटाचे तब्बल ६० फूट मोठे पोस्टर. हे अवाढव्य पोस्टर एका मोठ्या धबधब्यावरून खाली सोडत त्याचे अनावरण केले जाईल. या अनोख्या आणि नयनरम्य दृश्यावेळी चित्रपटातील सर्व प्रमुख कलाकार उपस्थित राहणार आहेत. चित्रपटाची मूळ कथा एका खजिन्याच्या शोधावर आधारित असल्यामुळे, हा संपूर्ण सोहळाही त्याच धर्तीवर थरार, दृश्यमानता आणि प्रेक्षकांचे मनोरंजन यांचा मेळ घालत डिझाईन करण्यात आला आहे.

इंद्र कुमार यांच्या दिग्दर्शनाखाली बनत असलेल्या या चित्रपटात अजय देवगण, रितेश देशमुख, अर्शद वारसी, संजय मिश्रा आणि जावेद जाफरी ही जुनी मुख्य स्टारकास्ट पुन्हा एकत्र दिसणार आहे. याशिवाय ईशा गुप्ता, संजीदा शेख, अंजली आनंद, उपेंद्र लिमये, विजय पाटकर आणि रवी किशन हे कलाकारही या विनोदी चित्रपटात नव्या भूमिकेत पाहायला मिळतील. हा चित्रपट १० जुलै २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

# सई मांजरेकर आव्हानात्मक भूमिकेत...






**अभिनेत्री** सई एम. मांजरेकर आगामी ‘इकाई’ या हॉरर चित्रपटाच्या माध्यमातून अभिनेता राघव जुयालसोबत एका अत्यंत वेगळ्या आणि भावनिकदृष्ट्या तीव्र अशा भूमिकेत पडद्यावर येत आहे. मुख्य प्रवाहातील व्यावसायिक चित्रपटांसोबत अभिनयाला वाव असणाऱ्या भूमिकांची निवड करणाऱ्या सईने या चित्रपटाबद्दल सांगितले की, हा तिच्या कारकिर्दीतील आतापर्यंतचा सर्वात आव्हानात्मक अनुभव ठरला आहे.

या चित्रपटातील काही दृश्यांसाठी आवश्यक असणाऱ्या भावना इतक्या तीव्र आणि वास्तविक होत्या की, तिला स्वतःला तिच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडून काम करावे लागले. एक कलाकार म्हणून नेहमीच स्वतःला आव्हान देण्याची आणि अभिनयाचे नवनवे पैलू शोधण्याची तिची इच्छा असते, जी या चित्रपटाने पूर्ण केली. ही प्रक्रिया काही वेळा थकवणारी असली तरी एक कलाकार म्हणून स्वतःचा विकास घडवण्यासाठी ती कमालीची समाधानकारक ठरली. हा चित्रपट पुढील वर्षाच्या सुरुवातीला प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.

# भाग्यश्रीने का खाल्ली यशजींची बोलणी?

सलमान खानसोबतच्या पहिल्याच ‘मैने प्यार किया’ या ब्लॉकबस्टर चित्रपटातून रातोरात प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचलेल्या अभिनेत्री भाग्यश्री पटवर्धनने वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी चित्रपटसृष्टी सोडण्याचा घेतलेला निर्णय सर्वांसाठीच धक्कादायक होता. एका ताज्या मुलाखतीत तिने आपण नाकारलेल्या ऐतिहासिक चित्रपटांच्या ऑफर्स आणि त्यानंतर ज्येष्ठ दिग्दर्शक यश चोप्रा यांच्याकडून खाल्लेली बोलणी याविषयीच्या आठवणींना उजाळा दिला आहे. भाग्यश्रीने सांगितले की, ‘मैने प्यार किया’ चित्रपटाचे चित्रीकरण आणि तो प्रदर्शित होणे यामध्ये सुमारे एका वर्षाचा मोठा काळ गेला होता. चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हा तिचे लग्न झाले होते आणि ती गरोदर होती. त्या वयात तिच्यासमोर दोनच पर्याय होते. एकतर प्रेमाचा स्वीकार करून संसारावर लक्ष केंद्रित करणे किंवा चित्रपटसृष्टीत करिअर करून प्रेमाचा त्याग करणे. तिने कुटुंबाला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. कारण त्या काळात या दोन्ही गोष्टी एकाच वेळी सांभाळणे शक्य नव्हते.

तिच्या या निर्णयावर मनोरंजन विश्वातील अनेक दिग्गज नाराज झाले होते. ती म्हणाली, मला यशजी या निर्णयावरून खूप ओरडले होते. या मोठ्या दिग्गजांसोबत काम करण्याची संधी हुकल्याची हुरहूर आज तिला नक्कीच वाटते. मात्र आपल्या निर्णयाचा कोणताही पश्चात्ताप नसल्याचे तिने स्पष्ट केले.





# मुंबईत जनगणना कर्मचाऱ्यांची कसरत
## तोंडावर दरवाजे बंद आणि कुत्रेही सोडले

■ मुंबई

**१६व्या** जनगणनेच्या घरनोंदणी टप्प्याची अंतिम मुदत १४ जून रोजी संपत असताना मुंबई महानगर प्रदेशातील जनगणना कर्मचाऱ्यांना नागरिकांच्या विरोधाचा सामना करावा लागत आहे. घराघरांत जाऊन माहिती गोळा करणाऱ्या शिक्षक आणि सरकारी कर्मचाऱ्यांना अनेक ठिकाणी प्रवेश नाकारला जात असून, काही ठिकाणी त्यांच्याशी उद्धट वर्तन केले. इतकेच नव्हे तर एका ठिकाणी कर्मचाऱ्यांवर कुत्रे सोडले तर काहींनी तोंडावर दरवाजे बंद केले.

भांडुपमधील भट्टीपाडा परिसरात जनगणनेच्या कामावर असलेल्या शिक्षिका प्रेरणा सिंग यांना झोपडपट्टीच्या प्रवेशद्वारावरच अडवले. स्थानिक ‘बॉस’ची परवानगी मिळेपर्यंत पुढे जाता येणार नसल्याचे सांगितले. अनेक तास प्रतीक्षा करूनही त्यांना काम पूर्ण करता आले नाही. काही शिक्षकांना नागरिकांकडून शिवीगाळ, दरवाजे तोंडावर बंद करणे आणि संशयाने वागणूक दिली जात आहे. ठाण्यातील एका झोपडपट्टीत एका रहिवाशाने माहिती देण्यास नकार देत जनगणना कर्मचाऱ्याचा व्हिडिओ चित्रीत केला आणि पुन्हा त्या भागात येऊ नका. अशी धमकीही दिली. विरोध केवळ झोपडपट्ट्यांपुरता मर्यादित नसून उच्चभ्रू गृहनिर्माण सोसायट्यांमध्येही जनगणना पथकांना अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे.

# ५ वर्षांनंतर मुंबई पोलिसांनी अपघाताचे गूढ उलगडले ! मित्रांनीच केली हत्या

■ मुंबई

सिंधुदुर्गातील फोंडा घाटात २०२१ मध्ये घडलेला आणि अपघाती मृत्यू म्हणून नोंदवण्यात आलेला प्रकार प्रत्यक्षात सुनियोजित हत्याकांड असल्याचे तब्बल पाच वर्षांनंतर उघड झाले. पैशांच्या वादातून अशपाक मुलानी यांची त्यांच्या मित्रांनीच हत्या करून मृतदेह दरीत फेकल्याचा आरोप आहे. मुंबई गुन्हे शाखेने या प्रकरणी मनोज भंडगे, सुरेंद्र सोनवडेकर, अतिश मोरे आणि ऋतुराज शेट्टी या चार जणांना अटक केली. तर अमित राऊत आणि मनोज भंडारी हे दोन आरोपी अद्याप फरार आहेत. सोलापूरच्या माळशिरस येथील रहिवासी व बारामतीत वास्तव्यास असलेले अशपाक मुलानी डिसेंबर २०२१ मध्ये सिंधुदुर्गातील फोंडा घाटात दरीत मृतावस्थेत आढळले होते.

# सोशल मीडियाचा वापर बदनामीसाठी करू नये
## सलमान खानच्या वादात उच्च न्यायालयाची टिप्पणी

■ मुंबई

**सोशल** मीडियाचा वापर सेलिब्रिटी असो वा सामान्य नागरिक कोणाच्याही बदनामीसाठी करू नये, बदनामी करणारे साहित्य प्रसिद्ध करण्याचा अधिकार कोणालाही मिळत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले. अभिनेता सलमान खान आणि त्याचा पनवेलमधील शेजारी केतन कक्कर यांच्यातील वादाच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने ही टिप्पणी केली. तसेच सलमान खानविरोधातील आक्षेपार्ह पोस्ट सोशल मीडियातून हटवण्याचे निर्देश कक्कर यांना दिले.

पनवेल येथे सलमान खानचा फार्महाऊस असून, केतन कक्कर यांची जमीन त्याला लागूनच आहे. सलमान खानने पर्यावरण नियमांचे उल्लंघन केले आणि आपल्या जमिनीकडे जाणारा रस्ता अडवला, असा आरोप कक्कर यांनी केला होता. याविरोधात त्यांनी प्रशासनाकडे दाद मागितली. मात्र कोणतीही कारवाई झाली नसल्याचा दावा कक्कर यांनी केला. यानंतर त्यांनी सोशल मीडिया आणि यूट्यूबवर वादग्रस्त पोस्ट केली होती. कक्कर यांनी सोशल मीडियावर केलेले ट्विट आणि यूट्यूब व्हिडिओविरोधात सलमान खानने मानहानीचा खटला दाखल केला होता. त्यावर अंतरिम दिलासा देण्यास दिवाणी न्यायालयाने नकार दिल्यानंतर सलमानने उच्च न्यायालयात दाद मागितली.

# सुर्या प्रकल्पाचे काम ७ वर्षापासून रखडले
## ऑगस्ट २०२६ पर्यंत चेना जलाशयात पाणी येणार

■ भाईंदर

**मीरा-भाईंदर** शहरात पाणीटंचाईचा प्रश्न सध्या गंभीर बनला आहे. सुर्या प्रकल्पातून शहराला २१८ दशलक्ष लिटर्स पाणी मिळणार असले तरी मागील ७ वर्षापासून हा प्रकल्प रखडलेला आहे. दरम्यान, ऑगस्ट २०२६ पर्यंत या प्रकल्पातील पाणी चेना गावाच्या हद्दीपर्यंत आणले जाणार असल्याची माहिती पालिकेने दिली.

एमएमआरडीएतर्फे सूर्या प्रादेशिक जलपुरवठा योजनेअंतर्गत मीरा-भाईंदर महापालिकेला २१८ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जाणार आहे. या प्रकल्पाची सुरुवातीचा खर्च ५१६ कोटी रुपये होता. मात्र विविध कारणांमुळे मागील ७ वर्षापासून या प्रकल्पाचे काम रखडले आहे. या विलंबामुळे प्रकल्पाचा अंदाजित खर्च आता ५२९ कोटीवर गेला आहे. दरम्यान, शहरात निर्माण झालेल्या पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीर आयुक राधाबिनोद शर्मा यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कामाचा आढावा घेतला. ऑगस्ट २०१६ अखेरपर्यंत या प्रकल्पातील पाणी चेना जलाशयात उपलब्ध होईल, अशी माहिती आयुक्तांनी दिली.

# मलबार हिलच्या नेचर ट्रेलवर झाड कोसळले

**मुंबई** - मलबार हिल परिसरातील नेचर ट्रेलवर झाड कोसळले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नसून, सुरक्षेच्या दृष्टीने हा ट्रेल तात्पुरता बंद करण्यात आला.



याची माहिती मिळताच पालिकेच्या उद्यान विभाग आणि जल अभियांत्रिकी विभागाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. पथकाने पायवाटेवर पडलेले झाड आणि त्याचे अवशेष हटवण्याचे काम सुरू केले. महापालिकेने खबरदारीचा उपाय म्हणून नेचर ट्रेल काही काळासाठी बंद ठेवण्यात आला. दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर आणि सुरक्षा तपासणी झाल्यानंतरच हा मार्ग पुन्हा खुला करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

# गांधीजींनंतर देशाचे मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद! सुप्रिया सुळेंचे व्याही लखानींचे वक्तव्य

■ मुंबई

**भाजपा** नेते, उद्योजक आणि विधान परिषदेवर बिनविरोध निवडून आलेले अरुण लखानी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तुलना महात्मा गांधींशी केलेल्या विधानामुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांचे व्याही असलेल्या लखानी यांनी मोदींच्या नेतृत्वाचे कौतुक करत लोकांवर प्रभाव टाकण्याची त्यांची क्षमता गांधीजींसारखी असल्याचा दावा केला.
अरुण लखानी म्हणाले की, महात्मा गांधी उपवासाचे आवाहन करायचे आणि संपूर्ण देश त्याला प्रतिसाद द्यायचा. तशीच क्षमता आणि तसाच आदर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल लोकांच्या मनात आहे. मोदींनी आवाहन केले की, लोक त्याचे पालन करतात. त्यांनी काटकसरीचे आवाहन केल्यानंतर लोकांनी



इंधनाचा वापर कमी करण्यास सुरुवात केली. मोदींच्या आवाहनानंतर आमच्या घरातील रेवती आणि सारंग यांच्या रिसेप्शनचा कार्यक्रमही २७ नोव्हेंबरचा स्वागत समारंभ १६ डिसेंबरपर्यंत पुढे ढकलला. पत्रिका छापून वाटल्याही होत्या. त्यामुळे थोडा गोंधळ झाला. मात्र लग्न नियोजित वेळेनुसारच होणार आहे. ते पुढे म्हणाले की, मोदींचा हा १२ वर्षांचा कालावधी भारतासाठी सुवर्णकाळ ठरला आहे. देशाचा विकास झाला, जगभरात भारताचा सन्मान वाढला. महिला, गरीब आणि वंचित घटकांसाठी राबविण्यात आलेल्या योजना क्रांतिकारी ठरल्या आहेत. विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसने उमेदवार दिले नाही. कारण महायुतीकडे स्पष्ट संख्याबळ होते. काँग्रेसला विजयाची आशा नसल्याने त्यांनी निवडणूक लढविण्याऐवजी माघार घेणे पसंत केले.

# रत्नाकर मोहिते व विश्वजीत भोसले यांचा महावितरणतर्फे विशेष सत्कार

■ कोल्हापूर



**महावितरणसारख्या** तांत्रिक यंत्रणेत काम करताना प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. आज प्रत्येक क्षेत्रात दररोज नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. प्रशिक्षणामुळे काळासोबत राहून ग्राहकांना अधिकाधिक चांगली सेवा देणे शक्य होते. यामुळेच महावितरण लाईनमन ते मुख्य अभियंता यांचे नियमित प्रशिक्षण जिल्हा, प्रादेशिक व राज्य स्तरावर आयोजित करत असते, असे प्रतिपादन महावितरणच्या राज्यातील मुख्य प्रशिक्षण केंद्र ‘एकलहरे’ नाशिकचे मुख्य महाव्यवस्थापक अरविंद भादिकर यांनी केले. कोल्हापूर लघुप्रशिक्षण केंद्राने राज्यात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल उपकार्यकारी अभियंता तथा केंद्राचे समन्वयक रत्नाकर मोहिते व ‘ग्राहक सेवा व संवाद कौशल्य’ या महत्त्वपूर्ण विषयावर अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणारे जनसंपर्क अधिकारी विश्वजीत भोसले यांचा मुख्य महाव्यवस्थापक अरविंद भादिकर यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. कोल्हापूर परिमंडलाच्या ताराबाई पार्क, कोल्हापूर येथील लघु प्रशिक्षण केंद्रात अरविंद भादिकर यांनी परिमंडलातील अधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी व्यासपीठावर कोल्हापूर परिमंडलाचे मुख्य अभियंता स्वप्नील काटकर, कोल्हापूर मंडलाचे अधीक्षक अभियंता गणपत लटपटे, ‘एकलहरे’प्रशिक्षण केंद्राच्या सहाय्यक महाव्यवस्थापक(मानव संसाधन) दीप्ती आंबेकर-माळवदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# कर्जमाफीच्या जाचक अटी रद्द करा
## किसान सभेची कृषिमंत्र्यांकडे मागणी

■ पुणे


**कर्जमाफी** योजनेतील जाचक अटी रद्द करून शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने दिलासा देण्यासह इतर मागण्यांसाठी किसान सभेच्या शिष्टमंडळाने राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांची भेट घेतली. या प्रश्नांवर मुख्यमंत्री स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन कृषिमंत्र्यांनी दिले असून, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा किसान सभेने दिला. या बैठकीला डॉ. अजित नवले, अजित अभ्यंकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

किसान सभेच्या प्रतिनिधींनी सांगितले की, सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीमध्ये अनेक अटी घातल्यामुळे मोठ्या प्रमाणावर शेतकरी लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे या सर्व अटी रद्द करून शेतकऱ्यांचा सातबारा खऱ्या अर्थाने कोरा करावा, देवस्थान जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना मालकी हक्क देण्यासाठी कायदा करण्याचे आश्वासन यापूर्वी किसान सभेच्या लाँग मार्चदरम्यान दिले होते. त्यानुसार कायद्याचा मसुदा प्रसिद्ध केला होता. मात्र काही संघटनांच्या विरोधानंतर हा प्रस्ताव स्थगित झाल्याने शेतकऱ्यांवर अन्याय झाला.

# नेस्को मृत्यू प्रकरणात अटक केलेल्या दोन अधिकाऱ्यांना कोर्टाकडून जामीन

**मुंबई** - गोरेगाव येथील नेस्को मैदानावर आयोजित कॉन्सर्ट दरम्यान अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे दोन एमबीए विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी अटक केलेल्या नेस्कोच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना मुंबई उच्च न्यायालयाने दिलासा दिला. न्यायालयाने वरिष्ठ व्यवस्थापक सनी जैन (३१ ) आणि लाईव्ह इव्हेंट्स अँड आयपी विभागाचे उपाध्यक्ष बाळकृष्ण कुरुप (४६) या दोघांना जामीन मंजूर करत प्रत्येकी एक लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर मुक्त करण्याचे आदेश दिले. या प्रकरणात दोघांना एप्रिल महिन्यात अटक केली होती. त्यांच्याविरोधात दारूबंदी कायदा आणि अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले होते. यापूर्वी सत्र न्यायालयाने दोघांचा जामीन अर्ज फेटाळला होता.

# नवाकाळ शब्दकोडे १६३५



**आडवे शब्द –**

२. रिकामा वेळ, फुरसत; प्रसंग ५. व्याख्यान देणारा ७. ब्राह्मण ११. चारित्र्यवान, शीलवान १२. रगेल, ताठर १४. याग १५. आळसात वेळ घालवणे १६. मागचे वर्ष १८. सतत स्त्रियात रमणारा १९. जोडीदार, सहचर २०. समजूतदार २२. दडपण, दबाव २३. प्रामाणिक २४. पृथ्वी, वसुधा २६. वर्दळ, वहिवाट २८. वनस्पतींचे चिवट तंतू; यापासून दोरखंड वळतात ३०. भीतीने सुटलेले कापरे ३१. एक पालेभाजी; ठोंब्या ३२. वांग्याच्या भाजीचा एक प्रकार ३४. रायआवळा ३७. तलवार ठेवण्याची जागा ३९. नर्तकीचा अलंकार ४१. केविलवाणा ४३. गरीब, दरिद्री, निर्धन ४४. सभा, बैठक ४६. उपाय, मार्ग ४८. स्वदेश, मातृभूमी ४९. मराठी नववा महिना ५१. लाल भोपळ्याचा गोड तळीव पदार्थ ५२. धुंदी, नशा ५३. व्रतस्थ स्त्री ५५. नाशवंत ५६. वालुकामय प्रदेश, वाळवंट ५७. माळ, गुंडाळी ५८. पाषाण ५९. लाकडी ओंडक्यांचा कामचलाऊ पूल ६०. रुई ६३. दुष्ट व्यक्ती; पिशाच्च ६४. नरकचतुर्दशीला चिरडले जाणारे फळ ६५. डोंगर, पहाड ६६. गुप्त धन ६९. अलगुज ७०. कर्मचाऱ्याचे वेतन ७२. खट्याळ ७३. टुमणे, धोशा ७५. काठ; पाऊल, टांग ७६. एक वातुळ कडधान्य ७७. तृतीया ७८. चलाख, बुद्धिमान ८१. काळोख, तिमिर ८२. गाण्याची लकेर ८४. जाडसर दळलेले गहू ८६. वितरण, बटवडा ८८. परीट, धोबी ८९. उंटाची मादी ९०. महती, थोरवी ९३. उट्टे, सूड ९५. दिखाऊ ९७. उपकरण ९८. कपी, हुप्प्या ९९. अपत्य, संतान १०१. कष्टांना सरावलेला १०२. द्वाररक्षक १०३. संकट, समस्या दूर करणे १०५. ओवाळणे १०६. पोपटाचे आवडते फळ १०७. टिंगल करणारा १०८. शैत्य, थंडी १०९. उत्सवाचा दिवस

**उभे शब्द –** १. भोवती २. मुरली, पावा ३. सगळे, सर्व ४. उबदार पांघरूण ५. उपवासाचे एक तृणधान्य ६. एक शेंगभाजी, फरसबी ८. सामर्थ्यवान ९. चीजवस्तू १०. प्रदान करणे; कर्ज १३. नक्षा, तोरा १४. जुना मोठा वाडा १७. विजया दशमी १९. संथपणे, हळू २१. अनेक फुले असलेला तुळशीचा दांडा; छोटी झांज; मुलींचे एक नाव २२. दानधर्म करणारा, उदार २३. गोषवारा, तात्पर्य २४. साधूचे निवासस्थान किंवा प्रार्थनास्थळ २७. हंगाम, फुलोरा २८. शस्त्राचा घाव २९. विकत घेणे ३०. किनारा ३२. नादी लावणे ३३. काया ३५. पार, पलीकडे ३६. श्रीकृष्णाचे भूपाळीतले एक नाव ३७. ब्रह्मदेशचे सध्याचे नाव ३८. वेळेवर पाऊस न पडणे ४०. अगदी जाड कागद ४२. पूर्वी कधी झाले नाही असे ४५. डोंगराचा तुटलेला भाग ४६. बंदुकीहून मोठे शस्त्र ४७. गावातील रहिवासी ५०. रक्तवाहिनी ५२. शिवशंकर ५४. अंत, शेवट ५८. अपशब्द ५९. आकाराला आलेले, तयार झालेले ६०. वस्त्र ६१. अखंडितपणे, नित्य ६२. कोरडा ६३. बखोट ६६. जेव्हा, ज्या वेळी ६७. सुदृढ, निरोगी ६८. गाव, पुर ६९. पवित्र, पुनीत ७१. केशरी रंगाचा कंद ७२. दरवाजा ७४. शय्या ७६. कपटी, कारस्थानी ७९. आदबशीर, सौजन्यपूर्ण ८०. कौशल्य, पटुत्व ८१. डोळ्यात टाकण्याचे औषध ८३. कष्टमय ८५. विष्णूचा एक अवतार ८७. फजिती ९१. पराभव ९२. मातबर, शिष्ट ९४. पाटलोण ९६. स्तुती, प्रशंसा ९८. ददात १००. सोललेल्या उसाचा तुकडा १०२. मद्य १०३. मार्ग १०४. जतन, देखभाल १०५. न्यारा, निराळा •

### नवाकाळ कोडे क्रमांक १६३४ चे उत्तर

**आडवे शब्द :** १. प्रजा ४. अमेय ७. दासवंती १०. ओगराळे १२. चंगळवादी १४. खवचट १६. दरवळ १८. डर १९. लपलेला २१. चानी २२. सनद २४. शिबिका २६. यजमान २८. यक्ष ३१. पडीक ३३. चरक ३५. बाई ३७. मत्स्यावतार ३९. मशाल ४१. लकब ४२. तल्लीन ४४. नीर ४५. कळप ४६. होम ४७. दालन ४८. थड ५०. लता ५२. वय ५३. कंडी ५४. भारी ५५. सल ५७. सपाट ६०. जथा ६१. रव ६२. कडीपाट ६५. बोजवारा ६७. सूड ६८. नळी ६९. छकडा ७१. रस ७४. राणी ७५. परतफेड ७७. चंपी ७८. भ्रमनिरास ८०. रेखा ८१. खरा ८२. पाचू ८३. भुई ८४. दादा ८६. लबाड ८७. गड ८८. परत ८९. शतदा ९०. सहोदर ९१. तरफ ९३. झुरळ ९४. गर्व ९५. झुबे ९७. तलग ९९. बारसे १०१. दाम १०४. अवनत १०६. मारेकरी १०८. वसू १०९. घसारा ११०. कडबा १११. वर्ग ११२. टणक ११३. हेवा ११४. शाल्मली ११५. वजन ११६. जठर

**उभे शब्द :** १. प्रचंड २. जागरण ३. शिवालय ५. मेखला ६. यव ७. दाट ८. वंदनीय ९. तीर १०. ओळ ११. राजनय १३. दीप १५. चलबिचल १७. वरमाई २०. लेपडी २३. दक्षता २५. तार २७. जबाबदारी २९. आमसूल ३०. अवनी ३१. पर ३२. कमळजा ३४. कलम ३६. गल्ली ३८. तारवट ४०. शाप ४२. तनसडी ४३. नथ ४६. होडी ४९. डच्चू ५१. तास ५३. कंथा ५४. भाव ५६. लपाछपी ५८. पाप ५९. गजरा ६०. जरा ६१. रडतखडत ६२. कळी ६३. टक ६४. निरभ्र ६६. वाणी ६७. सूड ६८. नड ७०. डाकाईत ७२. समजूतदार ७३. इरादा ७५. पखाल ७६. फेरा ७७. चंचू ७९. सदासर्वदा ८२. पाड ८३. भुरळ ८५. चांदणी ८७. गफलत ८८. परभारे ९२. रतनबाव ९६. बेअकली ९८. सारी ९९. बालंट १००. सेवक १०२. मघवा १०३. निराशा १०५. वड १०६. मार्ग १०७. कर्मठ १११. वन

## फडणवीस खोटे बोलण्यात पटाईत हर्षवर्धन सपकाळ यांची टीका



■ मुंबई

**राज्याचे** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गरिबी रेषा, स्वामीनाथन आयोग आणि शेतकरी धोरणांबाबत केलेल्या विधानांवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जोरदार टीका केली आहे. फडणवीस खोटे बोलण्यात पटाईत असल्याचा आरोप करत त्यांनी सरकारच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

मुंबईतील टिळक भवन येथे माध्यमांशी बोलताना सपकाळ म्हणाले की, देशात गरिबी निर्मूलन झाल्याचा दावा करत असताना ८० कोटी लोकांना मोफत रेशन का द्यावे लागते, हा प्रश्न उपस्थित होतो. गरिबी संपली असे सांगितले जात असताना एवढ्या मोठ्या प्रमाणावर लोकांना धान्य का दिले जाते? स्वामीनाथन आयोगाची स्थापना यूपीए सरकारच्या काळात झाली होती आणि अहवालही त्या काळात सादर झाला होता. मात्र, केंद्रात सरकार बदलल्यानंतर त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. मुख्यमंत्री फडणवीस चुकीचे दावे करत आहेत. राज्यात बियाण्यांची टंचाई आणि खतांमध्ये लिंकिंगचे प्रकार सुरू आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सरकारकडे प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती नाही.

## शरद पवार गट काँग्रेसमध्ये विलीन होणार?

» पान १ वरून

भूमिका योग्यच आहे. भाजपाकडून लोकशाही पायदळी तुडवली जात आहे. आपण सर्व लोकशाही वाचवण्यासाठी लढत आहोत. आता देशाला असा स्पष्ट संदेश देणे गरजेचे आहे की, आमच्याकडे असा नेता आहे ज्याला आम्ही सर्वांनी एकमताने स्वीकारले आहे. तेव्हाच जनता आपल्याला साथ देईल. एका बाजूला नरेंद्र मोदी आणि दुसऱ्या बाजूला राहुल गांधी असे चित्र उभे राहील तेव्हाच दोघांपैकी एकाला निवडण्याचा पर्याय जनतेपुढे असेल.

शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी विलीनीकरणाच्या विरोधी भूमिका मांडली. ते म्हणाले की, विलीनीकरणाच्या बातमीत कुठलेही तथ्य नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून विलीनीकरणासंदर्भातील कोणताही प्रस्ताव काँग्रेस पक्षाला देण्यात आलेला नाही. काँग्रेसकडूनदेखील तसा कोणताही प्रस्ताव आलेला नाही. काँग्रेसमध्ये विलीन होण्याच्या कोणत्याही प्रस्तावावर शरद पवार यांची आमच्यासोबत चर्चा केलेली नाही. नाना पटोले यांनी आधी आपल्या पक्षाची बांधावी. आमच्या पक्षाचा निर्णय आम्ही घेऊ.

## इराणवरील हल्ले आम्ही थांबवले

» पान १ वरून – परिसरात कोसळले. हा अपघात नसून इराणनेच आपले हेलिकॉप्टर पाडले आहे, असा आरोप करत अमेरिकेने बुधवारी पुन्हा इराणवर हल्ले सुरू केले होते. त्यानंतर आज शुक्रवारी ट्रम्प यांनी हल्ले थांबवण्याचे आदेश दिले. दुसरीकडे इराण आपल्या भूमिकेवर ठाम आहे. अमेरिकेशी युद्धबंदीची चर्चा सुरू आहे. मात्र अंतिम करारावर सहमती झालेली नाही, असे इराणने स्पष्ट केले आहे.

## मस्क जगातील पहिले ट्रिलियनेअर बनले

» पान १ वरून

सहसंस्थापक लॅरी पेज यांची संपत्ती सुमारे ३०४ अब्ज डॉलर आहे. याचा अर्थ मस्क हे त्यांच्या जवळच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा तीनपट अधिक श्रीमंत आहेत. मस्क यांची संपत्ती आता अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेपेक्षाही मोठी आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अंदाजानुसार तैवानची अर्थव्यवस्था सुमारे ९७६.६ अब्ज डॉलर इतकी आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता चिप्स आणि सेमीकंडक्टर उत्पादनाचे जागतिक केंद्र मानल्या जाणाऱ्या तैवानच्या अर्थव्यवस्थेपेक्षाही मस्क यांची संपत्ती अधिक झाली आहे. तसेच, जागतिक नाणेनिधीच्या अंदाजानुसार भारताचा जीडीपी सुमारे ४.१५ ट्रिलियन डॉलर असून, मस्क यांची संपत्ती भारताच्या एकूण अर्थव्यवस्थेच्या जवळपास एक-चतुर्थांश इतकी आहे. मस्क यांच्या संपत्तीत सर्वाधिक वाढ स्पेसएक्सच्या ७५ अब्ज डॉलरच्या विक्रमी आयपीओमुळे झाली. हा इतिहासातील सर्वात मोठा आयपीओ ठरला आहे.

समभाग विक्रीपूर्वी फोर्ब्सने मस्क यांची संपत्ती सुमारे ७८० अब्ज डॉलर असल्याचा अंदाज व्यक्त केला होता. स्पेसएक्समधील त्यांच्या हिश्शाचे मूल्य आता सुमारे ८६६ अब्ज डॉलर झाले असून, तो त्यांच्या संपत्तीचा सर्वात मोठा भाग बनला आहे. टेस्ला आणि इतर कंपन्यांतील त्यांच्या गुंतवणुकीसह मस्क यांची एकूण संपत्ती १.१ ट्रिलियन डॉलरच्या पुढे जाणार आहे.

## आ. रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन

» पान १ वरून

आंदोलनाला सुरुवात केली. ते म्हणाले की, कर्जमाफी योजनेतील सर्व जाचक अटी त्वरित रद्द करून शेतकऱ्यांना विनाअट सरसकट कर्जमाफी देण्यात यावी. सर्व पात्र शेतकऱ्यांना कोणत्याही जुन्या अटींशिवाय थेट २ लाखांपर्यंतची संपूर्ण कर्जमाफी मिळावी. पीकविमा आणि शेतकऱ्यांच्या खात्यात थेट आर्थिक मदत यांसह एकूण ७ प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सुरू केलेले हे आंदोलन कोणत्याही परिस्थितीत मागे घेतले जाणार नाही. अन्नत्याग आंदोलनात कितीही अडथळे आणले तरी आंदोलन थांबणार नाही. सत्तेचा अहंकार जनतेच्या ताकदीसमोर टिकत नाही. सरकार लोकशाही मार्गाने आवाज उठवणाऱ्यांना रोखण्याचा प्रयत्न करत आहे. आंदोलनात अडथळे निर्माण केले जात असले तरी प्रशासनातील अनेक अधिकारी मनाने आमच्यासोबत आहेत.

विशेष म्हणजे, आमदार रोहित पवार यांनी अन्नत्याग आंदोलन राज्यव्यापी करण्याच्या दृष्टीने पंढरपूरची केली असली तरी प्रत्यक्षात पंढरीत येणारे भाविक आणि राष्ट्रवादी शरद पवार गटातील प्रमुख नेते या सगळ्यांनीच रोहित पवारांच्या आंदोलनाकडे पाठ फिरवली. प्रत्यक्षात आमदार अभिजित पाटील, आमदार राजू खरे हे दोनच आंदोलनाला उपस्थित होते. खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार नारायण पाटील, आमदार उत्तम जानकर आणि विधान परिषदेचे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे उमेदवार तथा जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख हे मात्र दुपारपर्यंत तिथे फिरकलेले नव्हते.

## मोदी हे देशाचे सर्वोत्कृष्ट पंतप्रधान

» पान १ वरून

झाले हे अधिक महत्त्वाचे असते. मोदी यांनी जगभरात भारताची प्रतिष्ठा उंचावली असून, आज भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. जागतिक मंदीचे वातावरण असतानाही भारताचा विकासदर ७ टक्क्यांहून अधिक आहे आणि जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताची ओळख निर्माण झाली आहे. भारताची अर्थव्यवस्था ३४५ लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली असून, देश ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करत आहे. भारताकडे सध्या ६७ लाख कोटी रुपयांहून अधिक परकीय चलन साठा असून, पुढील ११ महिन्यांच्या आयातीचा खर्च भागवण्याची क्षमता देशाकडे आहे.

भारताच्या आर्थिक स्थितीबाबत बोलताना फडणवीस यांनी महत्त्वाचा दावा केला. ते म्हणाले की, एकेकाळी भारत परदेशी कर्जाच्या ओझ्याखाली दबला होता. कर्जफेडीसाठीही पुरेसे पैसे उपलब्ध नसत. मात्र आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. भारताकडे इतका परकीय चलन साठा आहे की, देशावरील परदेशी कर्जापैकी तब्बल ९४ टक्के कर्ज एका दिवसात फेडण्याची क्षमता आपल्याकडे आहे.


### जाहीर सूचना

सर्वसाधारण जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, **श्री. अल्ताफ मोहम्मद ददान** हे मुंबई येथे बनविलेल्या निवृत्ती सह पुनर्रचना करारनामा दिनांक २७ एप्रिल, २०२६ नुसार भागीदारी संस्था **मे. रॉयल लॅण्डमार्क** मधून दि. ३१ मार्च, २०२६ पासून निवृत्त झाले आहेत.

सदर संस्था, मे. रॉयल लॅण्डमार्क, पत्ता - खोली क्र. ६, १ला मजला, वझीर हाऊस, नवानगर, डॉकयार्ड रोड, माझगाव, मुंबई - ४०००१० यापुढे खालील व्यक्तींद्वारे :

i) **श्री. रिझवान मोहम्मद ददान** (कार्यरत भागीदार)
ii) **श्री. युसूफ रिझवान ददान** (आगामी भागीदार) मे. रॉयल लॅण्डमार्क, परमनंट अकाऊंट नंबर AAOFR2062D च्या त्याच नाव आणि शैलीमध्ये चालविण्यात येईल.

**तमाम जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते कीः**

१. श्री. अल्ताफ मोहम्मद ददान, निवृत्त भागीदार, हे गत, विद्यमान आणि भविष्यातील दायित्वे समाविष्ट असणाऱ्या, कोणत्याही समयी उद्भवणाऱ्या संस्थेच्या कोणत्याही कृती, करार, दायित्वे, व्यवहार किंवा जबाबदाऱ्यांकरिता जबाबदार असणार नाहीत.
२. कार्यरत भागीदार आणि आगामी भागीदार हे सर्व संबंधित कालखंडाकरिता संस्थेच्या व्यवस्थापन, आचरण, व्यवहार, दायित्वे आणि जबाबदाऱ्यांकरिता संपूर्ण जबाबदार असतील.
३. संस्थेशी व्यवहार करणाऱ्या सर्व व्यक्तींना संस्थेच्या घटनेमधील वरील बदलाची नोंद घेण्याची याद्वारे सूचना देण्यात येत आहे.
४. संस्थेविरुद्ध कोणताही दावा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तींना याद्वारे त्याबाबत संस्थेस त्यांचे नोंदणीकृत कार्यालय म्हणजेच खोली क्र. ६, १ला मजला, वझीर हाऊस, नवानगर, डॉकयार्ड रोड, माझगाव, मुंबई - ४०००१० येथे सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सहाय्यक दस्तऐवजांसह लेखी स्वरुपात सूचित करण्याची विनंती आहे.

सदर सूचना संस्थेद्वारे सर्वसाधारण माहितीकरिता आणि भारतीय भागिदारी कायदा, १९३२ च्या कलम ७२ सह वाचावयाच्या कलम ३२(४) च्या तरतुदींच्या अनुपालनामध्ये पारित करण्यात आली आहे.

**मुंबई, दिनांक १३ जून, २०२६**

**मे. रॉयल लॅण्डमार्क करिता त्यांच्या भागिदारांद्वारे**
सही/-
**श्री. रिझवान मोहम्मद ददान**
**(कार्यरत भागीदार)**
सही/-
**श्री. युसूफ रिझवान ददान**
**(आगामी भागीदार)**

### सार्वजनिक सूचना

कै.सावित्री गुलाब मुकुंदे या घाटकोपर काजरोलकर सहकारी गृहनिर्माण संस्था लि.च्या सदस्या, एस. जी. बर्वे नगर, घाटकोपर (प), मुंबई येथे पत्ता आहे.
सोसायटीच्या चाळ क्रमांक १२ मधील खोली क्रमांक ४६ मध्ये राहणारे ८४ वर्षीय सदस्य, यांचे २१ मार्च २०२६ रोजी कोणतेही नामनिर्देशन न करता निधन झाले. सोसायटी याद्वारे मृत सदस्याच्या सोसायटीच्या भांडवलातील/मालमत्तेतील उक्त शेअर्स आणि हिश्श्याच्या हस्तांतरणासंदर्भात वारस किंवा वारसदारांकडून किंवा इतर दावेदारांकडून/आक्षेपकर्त्यांकडून दावे किंवा आक्षेप आमंत्रित करत आहे. हे दावे किंवा आक्षेप, या सूचनेच्या प्रकाशनापासून १५ दिवसांच्या कालावधीत, मृत सदस्याच्या सोसायटीच्या भांडवलातील/मालमत्तेतील शेअर्स आणि हिश्श्याच्या हस्तांतरणा संदर्भातील त्यांच्या दाव्यांच्या/आक्षेपांच्या समर्थनार्थ अशा कागदपत्रांच्या आणि इतर पुराव्यांच्या प्रतींसह सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या कालावधीत कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर सोसायटी मृत सदस्याच्या सोसायटीच्या भांडवलातील/मालमत्तेतील शेअर्स आणि हिश्श्याबाबत सोसायटीच्या उपविधींमध्ये नमूद केलेल्या पद्धतीने व्यवहार करण्यास स्वतंत्र असेल. मृत सदस्याच्या संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील शेअर्स आणि हितसंबंधांच्या हस्तांतरणा संदर्भात संस्थेकडे प्राप्त झालेले दावे/आक्षेप, जर काही असतील तर, संस्थेच्या उपविधींमध्ये नमूद केलेल्या पद्धतीनुसार हाताळले जातील. संस्थेच्या नोंदणीकृत उपविधींची एक प्रत, तक्रारदार/आक्षेपकर्त्यांना, सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ते मुदत संपेपर्यंत, संस्थेच्या सचिवाकडे संस्थेच्या कार्यालयात सकाळी ११.३० ते दुपारी १२.३० या वेळेत पाहणीसाठी उपलब्ध आहे.
**साठी आणि वतीने**
**घाटकोपर काजरोळकर सीएचएस. लि.**
ठिकाण: घाटकोपर, मुंबई -८४
दिनांक: 13 जून २०२६
**सचिव**
**घाटकोपर काजरोळकर सीएचएस. लि.**

### जाहीर सूचना

सर्वसाधारण जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, **श्री. अल्ताफ मोहम्मद ददान** हे मुंबई येथे बनविलेल्या मे. रॉयल लॅण्डमार्कच्या निवृत्ती सह पुनर्रचना करारनामा दिनांक २७ एप्रिल, २०२६ नुसार भागीदारी संस्था **मे. रॉयल रिअल्टी** मधून दि. ३१ मार्च, २०२६ पासून निवृत्त झाले आहेत.

सदर संस्था, मे. रॉयल लॅण्डमार्क, पत्ता - खोली क्र. ६, १ला मजला, वझीर हाऊस, नवानगर, डॉकयार्ड रोड, माझगाव, मुंबई - ४०००१० यापुढे खालील व्यक्तींद्वारे :

i) **श्री. रिझवान मोहम्मद ददान** (कार्यरत भागीदार)
ii) **श्री. युसूफ रिझवान ददान** (आगामी भागीदार) मे. रॉयल लॅण्डमार्क, परमनंट अकाऊंट नंबर AAOFR2062D च्या त्याच नाव आणि शैलीमध्ये चालविण्यात येईल.

**तमाम जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते कीः**

१. निवृत्त भागीदार, श्री. अल्ताफ मोहम्मद ददान, हे कोणत्याही समयी म्हणजेच भूतकाळ, वर्तमानकाळ किंवा भविष्यकाळातील संस्थेच्या कोणत्याही कृती, ऋण, दायित्वे, व्यवहार किंवा जबाबदाऱ्यांकरिता जबाबदार असणार नाहीत.
२. संस्थेशी व्यवहार करणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे खबरदार करण्यात येते की, निवृत्त होणाऱ्या भागीदाराच्या संदर्भात फर्मशी केलेले कोणतेही व्यवहार त्यांच्या स्वतःच्या जोखमीवर असतील.
३. संबंधित सर्व वेळी, भागीदारी संस्थेचे सर्व कामकाज, दायित्वे आणि जबाबदाऱ्यांसाठी कार्यरत भागीदार आणि आगामी भागीदार हेच पूर्णपणे जबाबदार असतील.
४. सदर संस्थेविरुद्ध किंवा निवृत्त भागिदाराविरुद्ध संस्थेच्या संदर्भात कोणताही दावा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने त्याबाबत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, वायएमके लीगल, कार्यालय क्र. १२, १ला मजला, अजयदीप बिल्डींग, २४० पेरिनरिमन रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे सूचित करणे आवश्यक आहे. असे न केल्यास असे दावे, जर असल्यास, सोडून दिले असे समजण्यात येईल.

सदर सूचना सर्वसाधारण जनतेच्या माहितीकरिता आणि भविष्यातील कोणत्याही विवाद किंवा दावे टाळण्याकरिता आणि भारतीय भागिदारी कायदा, १९३२ च्या कलम ७२ सह वाचावयाच्या कलम ३२(४) च्या तरतुदींच्या अनुपालनामध्ये पारित करण्यात आली आहे.

**मुंबई, दिनांक १३ जून, २०२६**

सही/-
**वायएमके लीगल**
**अल्ताफ मोहम्मद ददान यांच्याकरिता ॲडव्होकेट**

### SBI भारतीय स्टेट बँक
**कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१**
**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भागाचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भागासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे इश्यूसाठी रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फाइनेंसियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद, तेलंगणा – ५०० ०३२ (इमेल आयडी: **einward.ris@kfintech.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक | | विभिन्न क्रमांक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| १ | ०१९०४६३७ | प्रवीण हरीश प्रभु जांत्ये<br>पुष्पा हरीश प्रभु जांत्ये | १००० | १६२८४३ | १६२८४३ | ७४२८२०००२१ | ७४२८२०१०२० |
| २ | ०१९०४६४१ | पुष्पा हरीश प्रभु जांत्ये<br>प्रवीण हरीश प्रभु जांत्ये | १२०० | १६२८४५ | १६२८४५ | ७४२८२०२५२१ | ७४२८२०३७२० |
| ३ | ०२५७५११९ | अड्डा लक्ष्मी | १५०० | २०१५८८ | २०१५८८ | ७४४८१५३८११ | ७४४८१५५३१० |
| ४ | ०१४६०३३९ | के आर कमलाकन्नन<br>आर अय्यम्मल | ५०० | १३३९४६ | १३३९४६ | ७४१३३१३४६१ | ७४१३३१३९६० |
| ५ | ०१४६०१२१ | आर अय्यम्मल<br>के के रामचन्द्रन | ५०० | १३३९२५ | १३३९२५ | ७४१३३०२५२१ | ७४१३३०३०२० |
| ६ | ०१२९३९३५ | सुकांता साहा<br>सुशांता साहा | १००० | १२८०४५ | १२८०४५ | ७४१०३९४६८१ | ७४१०३९५६८० |

**वरील आकडे रु. १/– दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई — समभागांची संख्या: **५७००** — महाव्यवस्थापक
**दिनांक:** १३.०६.२०२६ — स.प्रमाणपत्रांची संख्या: **६** — (शेअर्स व बॉण्ड्स)

### MAHAVITARAN — Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
**TENDER NOTICE**

Tenders are invited for procurement of New Insulating Oil as per IS 335 (amended up to date) with Estimated Cost of Rs. 166.15 Crs. against MSEDCL advertised Tender on website vide no. MMD/T-HTM2-10/0626 due for submission on dtd. 01.07.2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/

**HO PR 138/26** — **Chief Engineer (MMD)**

### MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
**E-TENDER 1st CALL NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for following works

| Sr. No. | RFX No. | E-Tender No. & Description of Material | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender |
|---|---|---|---|
| 1 | 7000040274 | **SE/EHV/O&M/CIR/KLW/TECH/Ten-10(1st call)/26-27**<br>E-Tender for Work of strengthening of deteriorated RCC / pile-type foundations of existing EHV towers of 220kV Kalwa-Mulund 1 & Mulund-Bhandup GIS D/c Line at TL No. 5 & 6 and of 220kV Kalwa-Mulund 2 & Mulund-Trombay D/c Line at TL No. 3 under EHV Line Maintenance S/Dn., Kalwa, under EHV (O&M) Division Kalwa | Tender Downloading Dates & time. Tender Sale period.<br>**From Dt :- 13.06.2026, 00:00 Hrs to Dt. 24.06.2026, 09:59 Hrs**<br>**Technical Opening :- Dt. 29.06.2026 at 10:00 Hrs** (Onwards if possible)<br>**Commercial Opening :- Dt. 29.06.2026 at 15:00 Hrs** (Onwards if possible) |
| | | **Tender Fee** | **Rs. 5000 + GST** |
| | | **Estimated Cost** | **Rs. 1,77,36,014.00/-** |

**Contact Person:** Executive Engineer / Dy. Exe. Engineer (O) Tel No. 7506379055

**Note :-** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**

